# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २०/१२/२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक २०/१२/२०११ रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.०१.२५ वाजता वंदे मातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
४. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
५. स.स. श्री राजगौरव हरीदास वानखेडे
६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२०. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२१. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२२. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२३. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
२५. स.स.श्रीमती जरीना म.जावेद

२६. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२७. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२८. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
२९. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३०. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३१. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३२. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३३. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३४. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३५. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३६. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
३७. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३८. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३९. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४०. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४१. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४२. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४३. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४६. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४७. स.स.डॉ.खान जफर अहेमद
४८. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४९. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
५०. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५१. स.स.श्री.खान आगा मिया खान
५२. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५३. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५४. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५५. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे

५६. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५७. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
५८. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५९. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६०. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६१. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६२. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६३. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६४. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६५. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६६. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६८. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६९. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७०. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७१. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७२. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७३. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७६. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७७. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
७८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७९. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८०. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८१. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८२. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

नामनिर्देशित पालिका सदस्य

स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

चर्चा :

श्री.अफसर खॉन :पाच दिवसापुर्वी १५ तारखेला रेल्वेस्टेशन रस्त्यावर चप्पल-बुट विक्रेते यांना तेथून हटविण्यासाठी पोलीसांना बोलवून त्यांना मारहाण केली लॉकअप मध्ये टाकले हातगाडीचे परवाना देवून त्यातून महापालिकेला उत्पन्न मिळत होते तेही बंद केले त्यांचेवर अशा प्रकारे कार्यवाही का केली खुलासा घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :या विक्रेत्यांनी आपल्याकडे अर्ज दिला त्यावर आपण २२ तारखेला बैठक आयोजिली आताच स.सदस्यांनी व्यक्त केलेली भावना योग्य आहे..शॉपींग सेन्टर समोरचे गाळे रस्त्याच्या रूंदीकरणात येत आहे तेथे दोन-तीन झाडे यामध्ये ही जागा येते.हे दुकानदार सकाळी हातगाडी लावतात संध्याकाळी परत घेवून जातात १५ तारखेला अचानक तेथे पोलीस येऊन त्यांना मारहाण करतात तेथून पोलीस स्टेशनमध्ये घेवून जातात.लॉकअपमध्ये टाकले जाते विचारणा केली असता माहिती देत नाही मा.आमदार श्री.एम एम शेख यांनी पोलीसाकडे माहिती विचारली मी प्रशासकीय अधिकारी श्री. झनझन यांना माहिती विचारली या संदर्भात महापालिकेने तक्रार दिली होती का तक्रार देण्याचे कारण काय मनपाकडे पोलीस कुमक असतांना अचानक पणे बाहेरीचे पोलीस येवून असा प्रकार करतात. हा निदंणीय प्रकार आहे. या विषयी आपण बैठक बोलवून त्या लोकांना योग्य तो न्याय दयावा.

श्री.खाजा शरफोद्यीन :अतिक्रमण होते म्हणून काढले त्यांना मारहाण केली लॉकअप मध्ये ठेवले कुणाच्या सांगण्यावरून हे सर्व केले.लोकांना गुन्हेगारांसारखी वागणुक दिली.

श्री.काशिनाथ कोकाटे : मराठी भाषिक असलेल्या बेळगांव महानगरपालिका ही लोकशाही पध्दतीने तेथे निवड झाली असतांना ती महापालिका कर्नाटक सरकारने बरखास्त केली महाराष्ट्रासाठीच नव्हे तर लोकशाहीला काळीमा फासनारी ही घटना आहे तेथे मराठी भाषीकावर अन्याय होत आहे.मराठी भाषीक शाळा बंद केल्या या राज्यात १५-१६ वेगवेगळया भाषीक शाळा आहे तसेच तेथील महापालिका सुध्दा थातूर मातूर कारण दाखवून बरखास्त केली ही अतिशय निदंणीय व अशोभनीय बाब आहे त्या सरकारचा निषेदाचा ठराव घ्यावा व तो मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य , मा.पंतप्रधान यांचेकडे पाठवावा व तेथील लोकांना न्याय मिळेल अशी कार्यवाही शासनाने करण्या बाबत शिफारस करावी.

श्री.कैलास गायकवाड :जो प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :यास माझे अनुमोदन आहे गेल्या ५०-५५ वर्षापासून शिवसेना या विषयावर लढा देते हा महाराष्ट्राच्या अस्मीतेचा प्रश्न असून सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे महाराष्ट्राच्या विधीमंडळातही सर्व पक्षाच्या

लोकानी असाच प्रस्ताव मांडला सर्व जनतेची भावना आहे बेळगाव असेल किंवा इतर पश्चिम भाग असेल हा भाग केद्रशाशित प्रदेश म्हणून जाहिर करण्याची भुमिका शासनाची आहे ती रास्त आहे कारण मराठी भाषिकावर होत असलेला अन्याय हा सहन करण्या पलीकडे गेला या ठरावाच्या प्रति मा.राष्ट्रपती तसेच मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री राज्य शासन यांना पाठवाव्यात व आपल्या भावना सीमा वरील महाराष्ट्रीयन व्यक्ती बरोबर आहे हे वरिष्ठ नेत्यांना दाखवून दयावे.

श्री.गिरजाराम हळनोर :पुर्वीपासून मा.शिवसेना प्रमुख या बांधवा बरोबर आहे असे असतांना कर्नाटक सरकार तेथे अन्याय अत्याचार तसेच मराठी शाळा बंद पाडतात शेतक-याच्या जमिनी सुध्दा लुबाडून घेतल्या जात आहे कायदयाचे पालन न करता बेळगावची महापालिका सुध्दा बरखास्त केली या गोष्टीचा सभागृह निषेध करते आपण सर्व त्या सिमा वरील लोकांबरोबर आहोत सभागृहाच्या भावना त्या लोकापर्यंत पोहचवाव्यात त्याची जी समिती आहे त्यांना कळवाव्या तसेच विधी मंडळाने जो प्रस्ताव घेतला त्यास या महापालिकेची सम्मती आहे अशा प्रकारचा प्रस्ताव व ठरावाची प्रत मा.पंतप्रधान व मा.राष्ट्रपती तसेच मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र,यांना पाठविण्याची कार्यवाही करावी.

श्री.महेश मांळवतकर :येथील भारतीय जनता पक्ष हा बेळगाव वासीयांच्या सोबत आहे. जो प्रस्ताव मांडला त्यास आमचे अनुमोदन आहे.

श्रीमती हेमलता मुगदीया:चप्पल बुट विक्रेतेवर जो अन्याय झाला त्यांना न्याय दयावा.

श्री.संजय जोशी :बेळगावचे प्रतिनिधी येथे आले तेंव्हा त्यांनी मराठी भाषिकावर कसा अत्याचार होतो सांगितले होते. महापालिकेत लोकशाही मार्गाने स.सदस्य निवडून आले असे असतांना अत्याचारीक पध्दतीने महापालिका बरखास्त केली सर्वांनी निषेध केला भारतीय जनता पार्टीच्या वतीने निषेध करतो तेथील मराठी भाषीकांना न्याय मिळावा पुन्हा तेथे महापालिका अस्तित्वात यावी यासाठी मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य , मा.राष्ट्रपती, मा. पंतप्रधान यांना तसे पत्राने कळवून निषेध करावा

या वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून बेळगाव महापालिका कर्नाटक सरकारने बरखास्त केली त्याबध्दल महानगरपालिकेच्या वतीने कर्नाटक सरकारचा निषेध करण्यात येतो. आताच चप्पल बुट विक्रेत्यांवर जो अन्याय झाल्याचे म्हटले खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी :रेल्वेस्टेशन भागात २२ टप-या अनधिकृत पणे रस्त्यावर आहेत पोलीस विभागाचे संबधीत यांनी फोनवर मनपाकडे तक्रार नोंदविली संबधीतांना वेळोवेळी सांगून सुध्दा त्या टप-या काढल्या नाही म्हणून त्यांचेवर गुन्हे दाखल केले त्यामूळे पोलीसांनी कार्यवाही केली

श्री.अफसर खॉन :रस्त्याच्या बाजूला दुकान लावतात मोठा गुन्हा केलेला नाही त्यांना मारहाण करण्यात आली लॉकअप मध्ये टाकले शहरात अनेक बिल्डरांनी अनधिकृत इमारती बांधल्या त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करते.

श्री.गजानन बारवाल :पोलीस कार्यवाही का केली, आपणांकडे पोलीस आहेत. आपण दंड करुन सोडतो.

प्रशासकीय अधिकारी :संबधीतावर गुन्हे दाखल केले होते पोलीसानी काय कार्यवाही केली माहित नाही.

श्री.मीर हिदायत अली :संबधीत अधिकारी दिशाभूल करीत आहे.अशा वेळी कशा प्रकारे कार्यवाही करावयला पाहिजे हे अधिकारी यांनी समजून घेतले नाही त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.गिरजाराम हळनोर : त्यांना न्याय मिळावा.

मा.महापौर :या संदर्भात महापौर निवासस्थानी बैठक आयोजित केली आहे योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.मीर हिदायत अली :एका टेबंलवर दोन माईक असावेत.

श्री.गिरजाराम हळनोर :पुढील सभेपर्यंत माईक सिस्टीम व्यवस्थीत करण्याची सुचना करावी.

मा.महापौर :सभागृहात एका टेबलवर दोन माईक सिस्टीमची कार्यवाही करावी.

श्री.अफसर खॉन :महापालिकेकडे पोलीस यत्रंणा असतांना पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्याची गरज का पडली.

श्री.गिरजाराम हळनोर :महापालिकेने या शहरामध्ये संमातर जलवाहिनीची योजना तयार केली ही योजना चांगल्या पध्दतीने तयार केली त्या बध्दल दिनांक ९ सप्टेंबर २०११ रोजी मा.श्री.अहलुवालीया उपाध्यक्ष नियोजन आयोग भारत सरकार यांचे हस्ते नवी दिल्ली येथे दिला त्या बध्दल सर्व प्रथम मा.महापौरांचे अभिनंदन या शहरामध्ये हा प्राजेक्ट तयार झाला व यामध्ये महापालिकेला पुरस्कार मिळालेला आहे मा.आयुक्तानी तो पुरस्कार त्या ठिकाणी जावून स्विकारलेला आहे त्यांचे सोबत कार्य.अभियंता श्री.पानझडे यांची टीम होती सभागृहाच्या वतीने आपले अभिनंदन करतो मा.आयुक्त श्री. भापकर साहेब ,श्री. पानझडे व त्यांचे टीमचे सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात यावा हा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर निश्चितपणे शहराचा विकास होईल तसेच या प्रोजेक्टसाठी मा.खासदार श्री. चंद्रकातंजी खैरे यांनी मेहनत घेवून केंद्र शासन व राज्य शासनाचा निधी मिळवून दिला एक चांगली बातमी महापालिके विषयी आली हा पुरस्कार कुण्या संस्थेने दिलेला नाही त्यांनी याचा अभ्यास केला म्हणून पुरस्कार दिला.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.यात

श्री.राजू शिंदे :स्वप्न पडते ही गोष्ट खरी होती परंतु स्वप्नातील एखादया मृत्यूला म्हणजे प्रोजेक्टला साक्षात्कार होवून पुरस्कार मिळतो हे ग्रिनीज बुक मध्ये नोंद होणारी गोष्ट आहे.हा पुरस्कार मिळण्यासाठी आमचे अधिकारी दिल्लीला जातात मी दिल्लीला शोध घेतो. एखादी संस्था

शोधायची ज्या एजन्सीने सत्कार केला त्या एजन्सीचा महापालिकेने ही सत्कार करावा.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खॉन :१ रू ची वस्तू ४ रूपयात घेतो सत्कार कशासाठी ,

श्री.राजू शिंदे :पुरस्कार मिळतो परंतु ९९ सदस्यांना ती योजना कळाली नाही त्या संस्थाला कशी समजली

श्री.गिरजाराम हळनोर :या टीमचा सत्कार करावा.

यावेळी अनेक स.सदस्य बोलत असतात.

श्री.मिलींद दाभाडे :या देशाला ज्या महापुरूषानी राज्य घटना दिली अशा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मुंबई येथील इंदूमिलची जागा चैत्य भुमीसाठी देण्याचा ठराव घेण्यात यावा.

श्री.राजू शिंदे :ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवावा.

मा.महापौर :शिवसेना नेते मा.खासदार श्री. च्रंद्रकांतजी खैरे यांनी आणलेला संमातर जलवाहिनीचा महत्वाचा प्रकल्प आहे सदस्यांच्या भावना लक्षात घेवून महानगरपालिका राबवित असलेल्या समांतर जलवाहिनीच्या प्रकल्पास मिडीया ग्रुप मुंबई आणि के पी सी. ॲडव्हायजर समिती यांचे विदयमाने पीपीपी प्रोजेक्ट सन २०११ चा पुरस्कार.श्री.अहलुवालीया उपाध्यक्ष नियोजन आयोग भारत सरकार यांचे हस्ते महापालिकेला मिळाला हा पुरस्कार महापालिकेच्या वतीने मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर यांनी स्विकारला.

श्री.राजू शिंदे :सत्कार जरूर करावा परंतु प्रकल्पाची माहिती सदस्यांना समजावून सांगावी.

याच वेळी मा.आयुक्त व कार्य.अभियंता व त्यांचे टीमचा सत्कार करण्यात येतो.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर घोषणा देतात.

श्री.राजू शिंदे :शहराचे मा.खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे साहेब यांचा ख-या अर्थाने सत्कार व्हायला पाहिजे परंतु त्याची आठवण झाली नाही.याचे दु:ख वाटते.

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(वेळ दु. १.५० वा. पुन्हा सभेला सुरूवात दु. २.१५ वा.)

श्री.राजू शिंदे :स.श्री.मिलींद दाभाडे यांनी इंदूमीलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकासाठी शासनाने देण्याचा ठराव मांडला त्यास स.सदस्य श्री. कैलास गायकवाड ,स.संजय जोशी व सभागृहातील सर्व पक्षाचे सदस्य याचीही मागणी आहे एक मताने ठराव मंजूर करावा.

श्री अ.साजेद अ.सत्तार : मी. मा.महापौर,मा.आयुक्त,व मा.नगरसचिव यांना पत्र देत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची राज्यघटना तयार केली त्या घटनेच्या अधारे हा एकमेव देश लोकशाहीच्या मार्गाने चालतो इंदूमिलची १२ एकर २० गुंठे जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकासाठी देण्या बाबतचा मांडलल्या ठरावास माझ्या वतीने राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या वतीने अनुमोदन देतो.

श्री.संजय जोशी :इतक्या दिवसात सर्व प्रोसेस होवून जागा दयायला पाहिजे होती स्मारकासाठी शासनाने निधीची सुध्दा तरतूद करावी व काम सुरू करावे असा ही ठराव करून शासनाला पाठवावा.

श्री.गजानन बारवाल :इंदूमिलची जागा केंद्र शासनाची आहे ती मिळावी असा ठराव करून शासनाकडे पाठवावा आमचा सर्वांचा पांठीबा आहे.

श्री.राजू शिंदे :यामध्ये स.श्री.मिलींद दाभाडे, श्री.कृष्णा बनकर, श्री.अमित भुईगळ , श्री.काशिनाथ कोकाटे , श्री.सजय जोशी, श्री.रेणुकादास वैद्य , श्री.गिरजाराम हळनोर या सर्वांचे नांव टाकावे तसा प्रस्ताव करून पाठवावा.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या भवना लक्षात घेता इंदूमिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकासाठी देण्या बाबत या महापालिकेच्या सभागृहाच्या वतीने ठराव राज्य शासनाकडे पाठवीण्यात येईल.

श्री.राजू शिंदे :सफारी पार्कसाठी शहरा लगतची १०० एकर जागा घेण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव गेला त्यास केंद्र शासनाचे अनुदान मिळणार आहे का की महापालिका २.८९ कोटी रूपये देत आहे खुलासा करावा.

संचालक.प्राणी संग्रहालय : सफारी पार्कच्या जागेच्या संदर्भात शासनाने या जागेचे महसूली मूल्य जे आहे ते भरण्यास महापालिका तयार आहे का विचारणा केली होती त्याअनुषंगाने कळविले की जमिनीची रक्कम भरण्यास तयार आहोत.

श्री.राजू शिंदे :शासनाने जागा दयावी असा ठराव दिला २.८९ कोटी देणार असा ठराव पाठविला नाही.

संचालक.प्राणी संग्रहालय:पुर्वी आपण सार्वजनिक प्रयोजन असल्यामूळे मोफत जागा दयावी म्हटले होते सभेचा ठराव दिला की ही रक्कम माफ करण्यात यावी उर्वरीत रक्कम कशी उभारणार आहोत विचारणा केली होती उर्वरीत रक्कम महापालिकेची उपलब्ध नसेल तर बीओटीवर काम करून उपलब्ध करून घेवू असे म्हटले होते त्यावर असे करणार असेल तर महसूल मुल्यामध्ये सुट देणार नाही असे म्हटले आहे.

श्री.राजू शिंदे : सफारी पार्क व्हावा यात शंका नाही परंतू आज एवढी रक्कम देण्याची परीस्थिती मनपाची नाही. जो प्रस्ताव पाठवला केंद्र शासन निधी देण्यास तयार असेल तर राज्य शासनाने ती जमिन नाममात्र दराने दिली पाहिजे.शासकीय एक-दुसरी जमिन देतांना नाममात्र दराने असते यात महापालिका उत्पन्न मिळविणार नाही पर्यटकासाठी ही सोय उपलब्ध करून देत आहोत.आजची परीस्थिती लक्षात घ्यावी १० लक्ष टोकन रक्कम देवून ती जागा मिळेल असे समजले नाममात्र दराने जागा देणार असेल तर घेण्यास हरकत नाही १.२५ लक्षची वस्तु १.०० लक्ष मध्ये मिळत असेल परंतु आज १ लक्ष देण्यास नाही तर जेंव्हा १ लक्षची पत होईल त्यावेळी विचार करावा.असे माझे मत आहे.आजची परीस्थिती विचारात घ्यावी प्राणी दत्तक घ्यावे ॲड देतो.आहे त्याच प्राण्यांना खाद्य देवू शकत नाही मा.आमदार श्री. वाणी साहेब यांनी

२६-१०-२०११ रोजी या प्राण्यांसंबंधी एलएक्यू केले महापालिका प्रांणी सांभाळते त्यांना खाद्य नाही किराणा, भाजी पाला व इतर पशुखाद्य पुरवठा धारक यांना आमचे पेमेंन्ट नाही ५-१०-२०१० रोजी मागणी केली लेखाधिकारी यांना भेटले त्यांनी पैसे नाही असे म्हटले पैसे नाही तर माल का पुरवठा करावा असे त्या विक्रेत्यांनी म्हटले १०० एकर मधे यापेक्षा जास्त प्राणी ठेवावे लागणार आहे तरच ते बघणारांची संख्या वाढेल कमी प्राण्याची संख्या असेल तर तिकीट घेवून कोणीही येणार नाही किती प्राणी तेथे असणार १०० एकर जमिनीचा शासन महसूल किती होणार शासन माफ करणार का खुलासा करावा मा.जिल्हाधिकारी यांचा येथील चार्ज दिला त्यांनी लगेच कार्यवाही केली हे योग्य वाटते का ?

संचालक,प्राणी संग्रहायल:मोफत जागा दयावी तसा ठराव २ वर्षापुर्वी करून पाठविलेला होता.

श्री.राजू शिंदे : नाममात्र दराने जागा दयावी असा ठराव केला होता.प्राणी संग्रहालय व्हावे सहमत आहे परंतु केंद्र शासन किती निधी देईल माहित नाही परंतु आज ३ कोटी भरण्याची परीस्थिती महापालिकेची नाही.नाममात्र दराने ही जागा शासन देत असेल तर हा प्रकल्प करण्यास हरकत नसावी.गार्डन वगैरे असणे ठिक आहे परंतु प्राणी संग्रहायल असावेच ही जबाबदारी नाही.

श्री.गजानन बारवाल :सेन्ट्रल झु ऑथर्टीने सांगितले त्या प्रमाणे लवकर प्रांणी संग्रहालय शिफ्ट करणेची दखल घ्यावी लागेल.निधीचा अभाव हा वेगळा भाग आहे जागा नाममात्र दराने मिळायला पाहिजे प्रयत्न करावे प्रस्ताव देवून त्यास मंजूरी घ्यायला पाहिजे होती जागा ताब्यात कशी लवकर येईल यासाठी प्रयत्न करावे प्रांणी संग्रहालय शिफ्ट करावे.

श्री.राजू शिंदे :शिफ्ट करावे शहराच्या सौदर्यात भर पडावी याबाबत दुमत नाही परंतु मा.विभागीय आयुक्त मा.जिल्हाधिकारी यांचेशी मा.आयुक्त व सर्व पदाधिकारी यांनी जावून चर्चा करून ही जागा नाममात्र दराने देण्याची मागणी करावी आज रोजी एवढी रक्कम भरण्याची परीस्थिती महापालिकेची नाही.

मा.आयुक्त :सुट्टीवर जाण्यापूर्वी पैशाचे नियोजन चालू होते पैसे देणे आहे व ते कमी आहे अशा परीस्थितीत महापालिकेची थोडीशी पत वाढविणे आवश्यक होते.त्या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्यासह चर्चा झाली होती १०० एकरचा भुखंड मिळतो त्या संबधी गेल्या वर्षभरापासून संपर्कात होतो.जिल्हाधिकारी यांना ही जागा नाममात्र दराने दयावी विनंती केली होती त्यांनी तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविला परंतु मान्य झाला नव्हता.१०० एकर जमिन मिळते आहे त्यांचे हेच म्हणणे होते की या जागेची मागणी करणारे अनेक लोक आहे.महापालिकेची पहिल्यांदा मागणी होती. शासनाने त्यांना सुचना दिल्या की महापालिको पैसे भरण्यास तयार असेल तर प्राधान्याने त्यांना देण्यात यावी.माझेशी त्याची चर्चा झाली पैसे भरण्यास तयार आहेत असे सांगितले होते.

जिल्हाधिकारी यांनी मा.विभागीय आयुक्तांच्या मार्फत प्रस्ताव शासनाकडे सादर केला तोप्रस्ताव मा.सचिव यांचेकडून महसूल मंत्री यांचेकडे गेला ४ दिवसापूर्वी त्यांचे बोलणे झाले मा. पालकमंत्री यांनी सुध्दा या बाबत पाठपुरावा करतो असे म्हटले.२.८९ कोटीमध्ये १०० कोटीची जागा मिळते.प्रांणी संग्रहालय हस्तांतर करण्याची गरज आहे नसता ते बंद होवू शकते. १०० कोटीची जमिन मिळते यामूळे महापालिकेची पत, मालमत्ता वाढणार .आर्थीक परीस्थिती नसेल तरी १०० कोटी ऐवजी ३ कोटी भरावे लागत असेल तर घेण्यास हरकत नसावी असा विचार झाला. सर्व संबधीताशी बोलून त्यांची पुर्तता करीत आहोत.जेंव्हा कर्ज घेतो तेंव्हा महापालिकेची पत व क्रेडीट ,इन्टरनल आणि एक्सर्टनल क्रेडिट व मालमत्ता किती पाहिले जाते.१०० एकर जमिन कमी किमतीत मिळत असेल महापालिकेची पत या निमित्ताने वाढणार आहे.एवढया रक्कमेत ही जमिन मिळते हा महत्वाच विषय असल्यामूळे या जागेचे पैसे भरण्याची तयारी आपण ठेवावी व जमिन ताब्यात घ्यावी असे मत आहे.

श्री.राजू शिंदे :सर्वांची सहकार्याची भावना या बाबतीत असू शकते. महाराष्ट्रात ४ ठिकाणी प्रांणी संग्रहालय आहे. ही जागा नाममात्र दराने घ्यावी.या जागेचे जर कुणी ५ कोटी देत असेल तर प्रथम प्राधान्य महापालिकेला दिले पाहिजे.ऑलरेडी महापालिका प्रांणी संग्रहालय चालविते यात महापालिकेची ही जबाबदारी नाही शासनाची जबाबदारी आहे.३ कोटीत १०० एकर प्रॉपर्टी वाढते म्हटले परंतु सरकारी दर ३ कोटीच त्या जागेचा असेल.कमीत कमी दराने घेण्याची कार्यवाही करावी.इंडिया फस्ट या कंपनीकडून कर्मचा-यांचा १२ लक्षचा इन्श्युरन्स काढला कंपनीचे कोणती स्कीम चांगली आहे कोटेशन वगैरे घेतले असेल खुलासा करावा.

श्री.कृष्णा बनकर :यापूर्वीही रिलायन्स कंपनीचा इन्श्युरंन्स काढला ती कंपनी सध्या अस्तित्वात नाही.कर्मचा-यांची सम्मती नसतानाही ही कार्यवाही का केली.दिलेला धनादेश परत घ्यावा.

मुख्यलेखाधिकारी :हा विषय कामगार विभागाशी संबधीत आहे.कामगार विभागाकडून संचिका आल्यानंतर त्यास मंजूरी दिली मा.आयुक्तांची मंजूरी मिळाल्यानंतर तो धनादेश देण्यात आला.

श्री.राजू शिंदे :कनिष्ठ विभागातून संचिका कशी सादर झाली त्यावर अवलंबून असते. लेखा विभागात इतर संचिका जातात त्यात क्युरी काढली यात का निघाली नाही.

मुख्यलेखाधिकारी :७ कंपन्याचे दरा बाबत कोटेशन मागविले होते त्यात इंडिया फस्ट या कंपनीचे कमी दर होते

श्री.राजू शिंदे :कंपनीने माहिती दिली नाही प्रशासनाने फक्त प्रोसेस करून घेतली.ज्या कर्मचा-यांनी सम्मती दिली नाही त्यांचे पेमेन्टमधून पैसे कपात होवू नये.

श्री.संजय जोशी :यापूर्वी रिलायन्स कंपनीच्या एजन्टने इन्श्युरन्स काढला होता इंन्श्यूरंन्स वेगळया स्कीमध्ये दाखवला व पैसे दुस-या स्कीममध्ये टाकले.कर्मचा-यांना माहित केले नाही जवळपास दरवर्षी ५ लक्ष रू भरणा करायचे असा इन्श्युरन्स होता.असे इन्श्युरन्स कर्मचा-याच्या सम्मतीशिवाय काढू नये असे ठरले होते. या प्रकरणात तत्कालीन कामगार अधिकारी यांचेवर कार्यवाही केली होती संबधीत एजन्ट यांना येथील इन्श्यूरंन्स मूळे परदेशवारी करण्याला मिळाली.कर्मचा-यांना विश्वासात न घेता कोणत्या नियमाने अशी कार्यवाही होते.खुलासा घ्यावा.

श्री.कृष्णा बनकर :श्री.अग्रवाल यांचा पेपरला ७ कोटीचा आर्थीक घोटाळयाची बातमी आली तसाच हा घोटाळा होईल इंडिया फास्ट कुठली कंपनी या शहरात तशी कंपनी नाही का धनादेश रद्य व्हावा कामागारांचे पैसे कपात होवू नये.

मा.महापौर :प्रशासनाने याबाबतीत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :प्रशासन व स.पदाधिकारी यांचेत बैठक होवून सिनेरेटीनुसार झालेले कामाचे बील टोकन सिस्टीम प्रमाणे देण्याचे ठरले असे असतांना मध्यतंरीच ४ लोकांचे बील देण्यात आले.विचाराणा केली असता मा.आयुक्तांचे सांगण्यानुसार बील देण्यात आले असे म्हटले संचिका बघीतली असता स.पदाधिकारी यांनी शिफारस केल्यानुसार धनादेश दिला असे म्हटले आहे.ते पदाधिकारी कोण आहे. दुस-या एका बिलाच्या प्रकरणात मा.खासदार श्री. चंद्रकांत खैरे यांचे पी.ए श्री. पटवर्धन यांनी शिफारस केल्यानुसार १६लक्ष बील दिले.मनपातील पदाधिकारी यांनी शिफारस केली असती तर समजू शकतो बाहेरील व्यक्तीची शिफारस लक्षात घेवून बील काढले जात असेल तर योग्य नाही.

श्री.गजानन बारवाल :संबधीत ठेकेदार मा.खासदार यांचेकडे गेले असेल त्यांनी त्यांचे पीए यांना सांगितले असेल त्यामूळे तशी कार्यवाही केली असेल.

श्री.राजू शिंदे : श्री.पटवर्धन यांनी बील घेणेसाठी प्रयत्न केले असेल परंतु ते शासकीय कर्मचानी नसल्याने रेकॉर्डवर संचिकेवर नावाचा उल्लेख करता येत नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :शिफारस केली असेल चुकीचे काम झाले नाही.विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.सुशिल खेडकर : विकास कामासाठी निधी नाही त्यामूळे ठेकेदार काम करण्यास पूढे येत नाही म्हणून जो तो आपआपल्या परीने लोकप्रतिनिधीकडे जाऊन काम करुण धेण्याचा प्रयत्न करतात कामाचे बील लेखा विभाग काढते परंतु वार्डात कोणती कुठे कामे होतात हे स्थानिक त्या त्या वार्डातील अभियंता यांना माहित असते.एखादयाने १० कामे घेतली असेल एकही बील मिळत नसेल तर याची जबाबदारी त्या त्या कार्य.अभियत्यांची आहे.एकाच विषयावर प्रत्येक वेळी तीच ती चर्चा होते मुख्यलेखाधिकारी

यांचेकडून विकास कामाचे धनादेश देण्याचे काम काढून कार्य.अभियंता यांना द्यावे.

श्री.राजू शिंदे : कार्य.अभियंता कडे धनादेशचे काम दिलेनंतर लवकर कामे होतील. ठरल्याप्रमाणे टोकन सिस्टमने पेमेंन्ट व्हावे.कुणाच्या सांगण्यावरून पेमेंन्ट काढले जात असेल तर योग्य नाही मा.आयुक्तांची मान्यता लागते.ती यात नाही ज्या अधिका-यांनी हे पेमेंन्ट दिले त्यांचे पगारातून वसूल करावे संबधीतावर कार्यवाही करावी त्यांना परत पाठविण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :स.श्री.अब्दुल सिंकदर अ.साजेद यांना त्यांचे वैयक्तिक कारणामूळे बैठकीला हजर राहता आले नाही त्यास मान्यता दयावी.

मा.महापौर :स.श्री कोकाटे यांनी सुचना केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येते. श्री.पटवर्धन यांचे सांगण्यावरून धनादेश दिला असला तरी तो झालेल्या कामाचाच होता का दिला असे म्हणणे योग्य वाटत नाही आर्थीक बजेट कमी असल्यामूळे ठेकेदाराची बिले देणेस उशीर होतो ठेकेदार काम करण्यास तयार होत नाही.

श्री.राजू शिंदे :२ लक्षच्या बीलासाठी मा.आयुक्तांची मंजूरी लागते असे यापूर्वी एका प्रकरणात सांगण्यात आले होते तर ४६ लक्ष बील कुणाच्या सांगण्यानुसार दिले मा.आयुक्तांची यास मंजूरी नाही खुलासा घ्यावा.

मा.्महापौर :यापूढे धनादेश सिस्टीमनेच क्रमवारी देवून धनादेश देण्यात यावे.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खॉन :मा.आयुक्तांचा खुलासा घ्यावा त्यांची मंजूरी आहे का.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हळनोर :पुर्वीप्रमाणे अधिका-यांच्या बदल्या कराव्या निर्णय घेतला होता त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही केली का ?

श्री.सुर्यकांत जायभाये :वार्ड क्र. ८३ व इतर वार्डातही मोठया प्रमाणात कचरा साचलेला दिसतो नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे रॅमकी एजन्सीने काम बंद केल्यानंतर साफसफाईचे काम कोण करणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :रॅमकी साफसफाई करीत नाही स.पदाधिकारी याची रॅमकी सोबत बैठक घेतली काय निर्णय झाला माहित नाही.

मा.महापौर :पुढील बैठकीत माहिती दिली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य :अधिका-यांच्या बदल्या केल्यामूळे वार्डात विकास कामे होत नाही झालेल्या बदल्या पुन्हा जशाच्या तशा त्या त्या ठिकाणी कराव्या असे आदेशीत केले अदयाप कार्यवाही केली नाही. माझ्या वार्डात चार दिवसापासून ड्रेनेज चोकअप क.अभियंतात्याचा फोन बंद उपअभियंत्यांना फोन केला ते काम आम्ही करायचे का असे उत्तर मिळाले त्यानंतर कार्य.अभियंता यांना फोन केला १-१ महिणा ड्रेनेज चोकअप निघत नसेल जाणूनबूजून त्रास द्यायचा का अधिका-याच्या बदल्या का होत नाही ? यावेळी अनेक सदस्य बोलत असतात.

श्री.महेश माळवतकर :०३ दिवसापासून साफसफाई कोण करते महापालिका की रॅमकी ेे, स.पदाधिकारी यांचे यांचे बैठकीत निर्णय होतात ते सर्वांना माहित

पाहिजे अनेक ठिकाणचा कचरा उचलला जात नाही. जेसीबी वेळेवर येत नाही. टँकरवरील कर्मचारी जेसीबीवर तर घटां गाडीवरील ट्रॅक्टरवर, लाईटच्या कामासाठी पाठविले जाते त्यामूळे वार्डात मोठया प्रमाणात कचरा साचतो वेळेवर कचरा उचलला जातो का, आर्थीक तरतूद केली का, ज्या अधिका-याच्या बदल्या झाल्या त्या जशाच्या तशा त्या त्या ठिकाणी कराव्या निर्णय झाला कार्यवाही का केली नाही.

श्री.समीर राजूरकर :बदल्या बाबत सभागृहाने निर्णय दिला कार्यवाही केली नाही.कोण कुठे काम करतात समजून येत नाही तीन दिवसापासून कचरा उचलला जात नाही कुंडयात कचरा साचला कुणीही लक्ष द्यायला तयार नाही प्रत्येक कामासाठी रस्त्यावर यावे लागणार असेल तर हे योग्य नाही सफाई होत नाही,रॅमकीचे काम बंद,प्रत्येक महिण्यात एक नवीन प्रश्न ड्रेनेज , लाईट, पाणी या बेसीक सुविधा वेळीच द्याव्या रॅमकी कचरा उचलत नाही, साईटवर काम होत नाही ,अधिकारी लक्ष देत नाही एक गाडी चार ठिकाणचा कचरा घे्वून गेल्यानंतर परत येण्यास ३ तास लागतात. बेसीक सुविधा देणेकडे लक्ष दयावे नियोजन कसे करणार माहिती दयावी.

श्रीमती प्रिती तोतला : रॅमकी असतांनाही कचरा उचलला जात नव्हता आता नियोजन काय,किती लेबर देणार माझ्या वार्डातील १७ लेबर त्यातून १० अनुपस्थित गुलमंडी भाग हा व्यावसायिक दृष्टीने , गजबजलेला भाग अनेक कुंडयामध्ये कचरा दिसून येतो.

श्रीमती सत्यभामा शिंदे :रॅमकीचे काम बंद केल्याने वार्ड ७३ मध्ये असलेले लेबर कच-यांच्या गाडीवर दिले किमान १० लेबर देण्यात यावे.हातगाडीची व्यवस्था करावी.

श्रीमती प्रिती तोतला :जशाच्या तशा बदल्या करण्याबाबत निर्णय घेतला १ महिण्यात कार्यवाही का केली नाही वार्ड ड तील जे.ई एक महिण्यापासून सुट्टीवर समस्या कुणाकडे माडाव्या. त्यांची दिर्घकालीन सुट्टी का मंजूर केली.

शहर अभियंता :शहरातील कचरा जमा करणे व लिप्ट करणेसाठी रॅमकी कंपनीला ऑक्टोबर २००९ मध्ये काम देणे बाबत करारनामा करून घेतला. एजन्सी काम करीत होती काम करीत असतांना काही तृटया आढळून आल्या त्यावर महापालिकेने ॲक्शन घेतली दंडात्मक कार्यवाही केली कामात सुधारणा न झाल्याने लिगल नोटीस दिली सहा महिण्यापूर्वी रॅमकीने महापालिकेला हा करारनामा रद्य करून ३० दिवसात काम एजन्सीकडून काढून घ्यावे नोटीस दिली त्यावर असे करता येणार नाही महापालिकेने कळविले डिसेंबर महिण्यात पुन्हा करारनामा रद्य करावा म्हणून त्यांनी नोटीस दिली. करानामा टर्मीनेट करता येणार नाही ज्या अडचणी असतील त्या प्रशासनासमोर ठेवून योग्य तो मार्ग काढू असे सुचविले परंतु रॅमकी तर्फे कोणीही पूढे आले नाही मा.महापौर यांनी त्यांना पत्र देवून बोलवले काल रॅमकीचे लोक आले मा.महापौर स.पदाधिकारी मा.आयुक्त यांनी त्यांचेशी चर्चा केली म्हणणे ऐकूण

घेतले समजावून सांगितले तरीही काम करण्यास नकार दिला १८ तारखेपासून काम बंद केले तेंव्हापासून महापालिका काम करीत आहे तक्रारी असतील त्या आठ दिवसात सोडविल्या जातील प्रत्येक झोनला गाडया दिलेल्या आहे.

श्री.कृष्णा बनकर :रॅमकीने एक महिणा अगोदर काम बंद करण्या बाबत पत्र दिल्यानंतर महापालिकेने यंत्रणा सज्ज का ठेवली नाही.

शहर अभियंता :काम करण्यास यंत्रणा सज्ज आहे.

श्री.कृष्णा बनकर :आमच्या कडील भागात दोन दिवसापासून कच-यांची गाडी येत नाही लेबर आले नाही.

शहर अभियंता :प्रत्येक झोनला कचरा उचलण्यासाठी आठ वाहन दिले आहे.

श्री.कृष्णा बनकर :एकही गाडी आली नाही कचरा उचलण्याबध्दल बोललो तर रजेवर जाईल असे झोन अधिकारी सांगतात हे योग्य नाही.

श्री.संजय केनेकर :रॅमकी साफसफाईचे काम बंद करणार आता महापालिका करणार यात कोणाची चुक आहे.

शहर अभियंता :जो करारनामा केला त्यानुसार रॅमकी कंपनी आर्थीक संकटात आले त्यामूळे काम करण्यास नकार देत आहे.

श्री.संजय केनेकर :रॅमकीची चुक होती तर काय दंडात्मक कार्यवाही केली.

शहर अभियंता :काम करण्याची विनंती केली परंतु नकार दिला त्यामूळे आता विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेणार आहोत

श्री.संजय केनेकर :मध्यतंरीच काम सोडले तर कोणती कार्यवाही करणार होतो प्रशासनाची भुमिका काय होती.

शहर अभियंता :रॅमकी एजन्सी काम सोडून गेल्यानंतर कार्यवाही करण्यास आता सुरूवात झाली आहे.वाहने सील केली आहे.

श्री.संजय केनेकर :शहर बस सारखी परीस्थिती होवू नये त्यात महापालिकेचे नुकसान रॅमकीकडीलन सर्व वाहने ताब्यात घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :आवश्यक वेळीच कार्यवाही करायला पाहिजे होती केली नाही साफसफाई व्हावी हा महत्वाचा आता विषय समोर आहे. रॅमकीला पाठविण्याचा निर्णय घेतला परंतु करारनामा झाला असे उत्तर मिळत होते.ती एजन्सी स्वत:हुन काम करण्यास तयार नाही करारनामा संपुष्टात आणू श्कातो.

शहर अभियंता :करारनाम्यातील अटी शर्ती महापालिका व रॅमकी दोघांना पाळणे बंधनकारक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :रॅमकी व महापालिका दोघांचीही सम्मती असेल तर करारनामा रद्य करू शकतो

शहर अभियंता : एजन्सीवर कायदेशीर कार्यवाही होईल साफसफाईचे काम आज रोजी चालू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पाहिजे तशी साफसफाई होत नाही. महापालिकेचे कर्मचारी काम करीत नाही म्हणून हा प्रयोग केला होता महापालिका आता सक्षमपणे काम करण्यास तयार असेल तर ठिक आहे नसता ६ प्रभाग निहाय

वेगवेगळे एजन्सीला काम देण्यात यावे कामाचा लोड वाढणार नाही.आवश्यक ते नियोजन करण्यात यावे.

शहर अभियंता :ज्या घटना झाल्या त्यानंतर जे नियोजन करायचे ते महापालिका करेल परंतु संबधीत एजन्सी अटी शर्ती नुसार काम सोडून जावू शकत नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :रॅमकी बरोबर करारनामा होत होता त्यावेळी त्यावेळच्या लोकप्रतिनिधीचा विरोध होता महापालिकेच्या कर्मचा-याकडूनच काम करून घ्यावे असे म्हणणे होते असे असतांना आचारसंहितेच्या काळात अचानक त्या एजन्सीला काम देण्यात आले.स्वच्छता होत नाही त्यास प्रशासन जबाबदार आहे

श्रीमती शिंदे सत्यभामा :वार्डात साफसफाई साठी मजूर वाढवून देण्यात यावे.

श्री.समीर राजूरकर :एक प्रभागात १६-१७ वार्ड त्यासाठी ८ वाहने प्रत्येकी दिल्याचे सांगतात. दिलेली वाहने काही नादुरुस्त गाडया दिल्या सर्व कचरा त्यामूळे उचलला जात नाही.

श्री.कृष्णा बनकर :रॅमकी करार नुसार काम करण्यास नकार देत असेल तर त्यांचेकडील वाहने कचरा उचलण्यासाठी घ्यावी.

श्री.राजू शिंदे :एजन्सीवर कार्यवाही करणार असे म्हटले परंतु तीच एजन्सी महापालिकेवर कार्यवाही करणार असे वाटते त्या एजन्सीला किती पेमेंन्ट दिले यापूर्वी रॅमकीच्या विरोधात बोललो एजन्सीच्या चुका असतील परंतु महापालिकेकडूनही चुका झाल्या २१ कोटी वाहनाचे हप्ते , २६ लक्ष डिझेलसाठी इतर खर्च ६ लक्षच्या वर आहे एजन्सीची चुक झ ााली आपले लेबर घेतले फायदा झाला परंतु शहर सुध्दा स्वच्छ झाले पाहिजे ही महापालिकेची जबाबदारी आहे.ज्या वेळेस काम देण्याचे वेळी चर्चा होत होती त्यावेळी एकत्रित बसून लेबर व वाहन चालक यांचेकडुन काय काम करून घ्यायचे विचार करायला पाहिजे होता.महापालिकेचे वाहनचालक त्यांचे गाडयाचे पार्ट ,टायर काढून आणत असे एजन्सीने अनेकदा तक्रारी दिल्या त्याचा निपटारा महापालिकेने केला नाही.गाडया, डस्टबीन एजन्सीचे, लेबर,वार्ड अधिकारी,स्वच्छता निरीक्षक महापालिकेचे ३०० लोक दिले तेही महापालिकेच्या क्षेत्रातीलच पुर्वी प्रत्येक वार्ड कार्यालय ३५०-४०० लेबर कामासाठी होते परंतु ३०-४० दररोज गैरहजर राहत झोन अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षक यांना दरमहिण्याला गैरहजर असणा-याकडून पैसे मिळत असे पुर्ण हजेरी जात होती परंतु आता त्या लेबरांना दांडी मारता येत नाही म्हणून जोतो रॅमकीच्या बाबतीत तक्रार देतो गाडी केंव्हा किती वेळा जाते हे बघण्याची जबबदारी महालिकेची आहे.पुर्वी ३ वेळा गाडी कचरा घेवून जात असेल आता एक गाडी एकच वेळ कचरा डेपोत जाते.डिझेल साठी वेगवेगळया ठिकाणी नंबर लावावे लागतात ही जबबादारी महापालिकेची सुध्दा आहे.एका कर्मचा-यास १५-२० हजार पेमेन्ट एजन्सीला ३०००रू ्प्रमाणे लेबर मिळेल ते नुकसान त्या एजन्सीचे झालेच त्यांचे लेबर महापालिकेचे लेबरचे पेमेन्ट परस्पर

दिल्या जाते त्या लेबरनी काम केले किती दिवस केले विचारणा केली जात नाही.स.सदस्यांनी एखादया कर्मचा-याची तक्रार केली असेल तर त्यांचेवर कार्यवाही होत नाही त्यामूळे आज ही वेळ आली.ही वेळ येण्याला महापालिका सुध्दा तितकीच जबाबदार आहे.त्या गाडया वापरण्याला हरकत नाही परंतु लिगल गॅरन्टी घेतली का हे सुध्दा तपासावे पर्यायी व्यवस्था म्हणून सफाईचे काम महापालिकेकडील वाहनामूळे होणार नाही.लिगली त्यांची वाहने घ्यावी महापालिकेची आर्थीक परीस्थिती नसल्याने ती वाहने तात्पुरती घेवू शकतो जो खर्च असेल तो देवू करू असे सांगू शकतो परंतु त्या वाहनांना सील लावले असे करून काम होणार नाही.१३ व्या वित्त आयोगातील रक्कमेतून पुर्ण वार्डासाठी प्रत्येकी एक ॲटो टिप्पर घेण्याचे सुचविले पेमेन्ट दयायचे म्हणून खर्च केले नाही.१३ व्या वित्त आयोगातून घनकचरा वर ५६ टक्के रक्कम खर्च करता येते परंतु केली जात नाही.टिप्पर खरेदी करावे केले नाही, जेंटींग मशीन घेतले नाही तर प्रशासनाचा खर्च होतो कुठे जी कार्यवाही वेळीच करायची ती केली जात नाही असा प्रसंग आल्यानंतर बैठका घेणे वगैरे चालतात यातून मार्ग निघेल असे वाटत नाही.झोन अधिकारी यांचेवर जबाबदारी दयावी किती कर्मचारी हजर किती गैरहजर असतात तसेच कायमस्वरूपी कर्मचारी किती उपआयुक्ताकडून खुलासा घ्यावा.

उपआयुक्त (प्र) :वार्ड कार्यालयाकडून माहिती घेवून सांगता येईल

श्री.राजू शिंदे :साफसफाई व्हावी यासाठी स.सदस्य तळमळीने बोलतात परंतु किती कर्मचारी गैरहजर असतात हे अधिकारी यांना माहित नसेल तर दुर्देव आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्ड ई प्रभागात काही वार्डत २५ लेबर तर काही वार्डात ७ लेबर आहे.

श्री.राजू शिंदे :शहर स्वच्छ होणे महत्वाचे आहे रॅमकी एजन्सीशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला पाहीजे त्यांचे सुध्दा काही अडचणी असू शकतात दोन वर्षात त्यांना किती पेमेन्ट केले किती दयायला पाहिजे होते दोन्ही बाजूचा विचार करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :तो करारनामा कोणी व कुणाच्या दबावाखाली केला की प्रशासनाने केला सर्वांना माहित आहे.करार ठेवायचा की रद्य करायचा यापेक्षा शहरातील कचरा उचलला पाहिजे कच-याची विल्लेवाट कशी लावायची प्रशासनाची जबाबदारी कोणाची किती चुक त्याप्रमाणे कार्यवाही व्हायला पाहिजे परंतु ती वेळ गेली आता कचरा कशा पध्दतीने उचलणार ते सांगावे. रॅमकीवर कार्यवाही करतांना कायदेशीर बाबी तपासून करावी.यात प्रशासनालाच दोष देणे योग्य नाही बॉडी प्रशासन चालविते आपलाही त्यात सहभाग आहे.चर्चा करून कोणास टारगेट करणे योग्य नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :१२ व्या वित्त आयोगातून जे खरेदी करायचे होते ते खरेदी करावे तसेच १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ५६ टक्के रक्कम घनकच-

| | |
|---|---|
| | यावर खर्च करता येत असेल तर ती करावी तसेच अधिका-यांच्या बदल्या संदर्भात खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :काल रॅमकी एजन्सी सोबत बैठक झाली. या एजन्सीचे कामास २ वर्ष झाले १० वर्षाचा करारनामा असतांना एजन्सीची काम करण्याची मानसिकता नाही काम न करण्याची तयारी दर्शविली.प्रशासनाने शहर स्वच्छ करण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे म्हटले सर्व स.पदाधिकारी, मा.आयुक्त शहर अभियंता तसेच घनकचरा व्यवस्थापक सर्वांनी एकत्रित बसून शहर स्वच्छतेसाठी कशी यंत्रणा राबविणार याचा विचार करणार,या एजन्सीवर कोणती कार्यवाही करायची त्या विषयी कायदेशीर सल्ला घेवूनच कोणती कार्यवाही करायची सर्वसाधारण सभा ठरवेल.ड्रॉ पध्दतीने कनिष्ठ अभियंता व इतर अभियंत्याच्या ज्या बदल्या केल्या पुन्हा जसे थे कराव्या म्हणून एक महिण्यापूर्वी आदेशीत केले होते बदल्या का केल्या नाही. |
| शहर अभियंता | :पुर्वी प्रमाणे जशाच्या तशा बदल्या करण्या संदर्भात जो निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला त्यानुसार आदेश निर्गमित झालेले आहे २-३ दिवसात संबधीत अधिकारी त्या विभागात रूजू होतील. |
| श्री.मीर हिदायत अली | : शिक्षण विभागाच्या अंतर्गत मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात प्रशिक्षण चालू आहे मराठीतून समजावून सांगितले जाते अनेकांना अडचण येत आहे त्यासाठी उर्दु माध्यम मधून प्रशिक्षणाची माहिती देणेसाठी तेथे शिक्षक पाठवावे. |
| मा.महापौर | :सदर प्रशिक्षासाठी उर्दु माध्यमचे शिक्षक सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तात्काळ देण्यात यावे. |
| श्री.कृष्णा बनकर | :आरसीएच बध्दल माहिती मागविली होती चुकीची माहिती दिली. |
| श्री.राजू शिंदे | :अनेक स.सदस्यांना व अधिकारी यांना कार्यक्रमासाठी जायचे असल्याचे आजची सभा तहकूब करावी. |
| श्री.संजय केनकर | :३४ तासीका शिक्षक भरती प्रकरणा चौकशी अहवाल आला का तो आपण वाचलेला आहे का त्यात १९-२० दोष दाखविले त्याबध्दल आपले मत काय ? |
| श्री.मीर हिदायत अली | :ज्या शाळेत विदार्थी नाही त्या शाळा बंद करून ते शिक्षक इतर दुस-या शाळेवर दिले परंतु शाळा बंद झाली नाही व शिक्षकही दिले नाही. |
| श्री.संजय केनकर | :शिक्षक भरती प्रकरणात अहवाल दिला कोण दोषी ते दिले नाही अर्धवट अहवाल का दिला.आरसीएच भरती व शिक्षक भरतीचा अहवाल गोलमोल दिला जातो समिती ही भरती रद्य करण्यासाठी नेमली होती का ?समितीने दोषीचे नावे का दिली नाही यांना नोटीस द्यावी. आरसीएच संदर्भात माहिती मागविली बरोबर दिली नाही. जो तो अधिकारी त्यांचे पध्दतीने माहिती देत असेल तर योग्य नाही.दोन वर्षापासून एका विभागाचा पीएफ भरलेला नाही मुख्यलेखाधिकारी यांना विचारणा केली तो विभाग येथे आहे की नाही मलाच माहित नाही |

त्याचा पत्रव्यवहारच झाला नाही असे उत्तर मिळते पी एफ भरण्या संदर्भात पत्र येते ज्या त्या विभागाची त्या त्या अधिका-याकडे माहिती नाही प्रत्येक बाबतीत स.सदस्यांना चुकीची माहिती मिळते.हे योग्य नाही अधिकारी यांनी जबाबदारीने व हिमतीने काम करावे चुकीचे काम करू नये.

मा.महापौर :चौकशी अहवाल ज्यांनी तयार केला त्यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :३४ तासीका शिक्षक भरती प्रकीर्येसाठी जवळपास ६ महिणे लागले व अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या तक्रारीच्या पार्श्र्वभुमीवर शहानिशा करण्यासाठी उपआयुक्त(म),यांचे नेतृत्वाखाली कार्य.अभियंता श्री.पानझडे तसेच उपअभियंता श्री. काझी या तीन अधिका-याची समिती नेमण्यात आली होती या समितीने सर्व बाबींची पाहणी केली तपशिल वार अहवाल दिला व तो देतांना भरती प्रकीर्येमध्ये काही मुद्दे अडचणी आहेत काही मूद्दे क्लिअर नाही भरती प्रक्रिया रद्द करणे आवश्यक आहे असे म्हटले त्या अनुषंगाने आपण त्यांना आदेशीत केले व भरती प्रक्रिर्या रद्द केली भरती प्रक्रिर्या ज्यांनी केली त्यांचे विरूध्द काय कार्यवाही केली अशाही तक्रारी होत्या.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्त भरती प्रक्रियेला स्थगिती दिल्यानंतर पुन्हा भरती प्रकीर्या सुरू का करण्यात आली.

मा.आयुक्त :भरती प्रकिर्या सुरू करण्याचे आदेशीत केले होते.

श्री.राजू शिंदे :उपआयुक्त महसूल यांनी भरती प्रकीर्येला स्थगिती दिली असे सांगितले होते ते चुकीचे होते.

मा.आयुक्त :भरती प्रकिर्या ही रेग्यूलर होती, शिक्षकाची भरती प्रकीर्या ही तासिका बेसवर होती.८ वी ते १० वी चे नवीन वर्ग सुरू झाले त्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नव्हते.त्यासाठी ,नव्याने एमएससी बी.एड झालेले शिक्षक यांना वरच्या वर्गाना गणित, इंग्रजी विषय शिकविण्यासाठी शिक्षकाची गरज आहे.खरे म्हणजे वरचे वर्ग महापालिकेचे निर्माण झाले ७ वीची मुल आठवीमध्ये गेली. यास तशी मान्यता व शिक्षक भरतीची जी आवश्यक मान्यता शासनाकडून पाहिजे होती ती नाही.७७ शाळा आहे त्यासाठी ५३४ शिक्षक आहे जे वर्ग वाढले त्यासाठी शिक्षक पदे शासनाकडून मंजूर झाली पाहिजे ती मंजूरी नाही त्या अगोदरच ८ वी ते १०वी चे वर्ग सुरू केले.त्या मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक नव्हते इतर काही शाळेतील शिक्षक व बाहेरील काही शिक्षक तात्पुरत्या स्वरूपात शिकविण्यासाठी दिले होते त्या बाबतीत काही तक्रारी आल्या त्यामूळे या मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक असावे म्हणून तासीका बेसवर ३४ शिक्षक भरावे या बाबत चर्चा झाली भरती प्रक्रिया सुरू झाली ती लांबणीवर पडली ६-८ महिणे गेले हे सर्व झाल्यानंतर तक्रारी निर्माण झाल्या त्या पाहता व समितीने जो निर्णय दिला त्यानुसार ही भरती प्रक्रिया स्थगित,रद्द करण्याचे समोर आले परंतु कमेटीने रिर्पोट केला या प्रकरणामध्ये बरेचसे कर्मचारी

होते.काहीचे कागदपत्र आले काही कागदपत्र परत दिले नव्हते.अशा ब-याच तक्रारी होत्या या सर्व प्रकरणात कोण दोषी आहे. समितीने स्पष्ट अहवाल दयावा असे आदेशीत केले होते.समितीचा अहवाल आलेला नाही जे जबाबदार आहे त्यांचेवर कार्यवाही करता आली नाही.

श्री.महेश माळवतकर :८ वी ते १० वीचे शिक्षण घेणारे विदयार्थी त्यांना माध्यमिक शिक्षकांनीच शिकवणी दिली पाहिजे.१८ जानेवारीला प्रक्रिया सुरू करण्यास एक वर्ष होईल त्या गरीब विदयार्थ्याकडे दुर्लक्ष करण्याचे कारण काय ५४/-रू.तासीका बेस वर घेणार होतो यातही भ्रष्टाचार करण्याचे धोरण असेल ज्यांनी केले त्यांचेवर कार्यवाही करावी २-३ वर्ष काही शिक्षक पगार न घेता या मुलांना शिकवीत होते त्यांना घेणेचा विचार केला नाही.जाहिरात देतांना जे विना पगारी शिकवितात त्यांना प्राधान्य दिले जाईल असे दयायला पाहिजे होते.तसे न करता डायरेक्ट भरती करण्याचे ठरविले तेही तासीका बेसवर त्यासही एक वर्ष होत आले.येथील कर्मचारी यांची कोणाचीच मुले मनपाच्या शाळेत नाही त्यामूळे दुर्लक्ष करतो का?माझ्या मते मा.आयुक्त यांनी त्यांचे सेवा कालावधीत सर्वात जास्त लक्ष शिक्षणावर दिले परंतु ही तासीका बेसवर पदे भरण्यास एक वर्ष का लागले.ज्यांनी भरतीत चुक केली त्यांना शिक्षा दया परंतु जे शिक्षक निवडले ते डायरेक्ट आले नाही जाहिरात दिली त्यांची परीक्षा घेण्यात आली महापालिकेत काम करायला मिळते म्हणून काहींनी दुसरीकडील नोकरी सोडून आले.त्याची निवड झ ाल्यानंतर त्यांना पत्र दिले त्यानंतर कुणीतरी आरोप प्रत्यारोप करतरत यात पैसे घेतले अनियमितता झाली असे म्हणणार ज्यांची निवड झाली त्याची चुक नाही चौकशी जरूर करावी परंतु या मुलांना १ महिण्याच्या आत शिक्षक उपलब्ध करून देवू अशी ग्वाही दयावी १-१ वर्ष चौकशीच होत असेल व प्राथमिक शिक्षकांना त्यां मुलाना शिकविण्याचे सांगत असाल तर योग्य नाही.आपल्या पाल्यांना जर अशा शिक्षकानी शिकविले तर आपण सहन करणार नाही गरीबांची मुले असेल तर काही करायचे हे बरोबर नाही. असे धोरण ठेवले तर कुणाचाच विश्वास बसणार नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : अहवाल आलेला आहे काय कार्यवाही करायची नाही करायची भाग वेगळा आहे.तो विषय येथे आज संपवला पाहिजे.मनपाच्या शाळेत २७-२८ हजार मुलांना शिक्षक शिकवतील एवढे शिक्षक आहे या शिक्षकामध्ये बीए बीएड ,एमएड, झालेले शिक्षक आहे. १५-१६ हजार विदयार्थी सध्या मनपाच्या शाळेत आहे शासनाच्या नॉर्मनुसार १०० शिक्षक एक्स्ट्रा आहे या शिक्षकाचे समायोजन केले व ८ ते १० वीच्या विदयार्थ्यांसाठी यातून पात्र शिक्षक निवडले जावू शकतात.यास जास्त कालावधी लागणार नाही.८ते १० वीच्या वर्ग चालू केले तेथे या शिक्षकामधून बीएड बी.पीएड ,एम.एड शिक्षकातून शिक्षक देण्यात यावे.त्या मुलांना शिक्षणापासून वंचीत ठेवू नये.

श्री.मीर हिदायत अली :१५ शाळा अशा आहेत की त्या बंद करू शकतो व ज्या शाळेत शिक्षक कमी आहे तेथे हे शिक्षक देवून समावयोजन करून जे बीएड बीपीएड एमएड असे पात्र शिक्षक आहे ते या मुलाना शिकविण्यासाठी देवू शकतो.भरती संदर्भात अहवाल अर्धवट का आला त्याबाबतीत चौकशी करण्यासाठी समिती नेमावे शहाबाजार शाळेत सायन्स ,गणित व इंग्रजी विषय शिकविणारे ३ शिक्षक आहे त्यांना तेथे देण्यात यावे.

श्री.संजय चौधरी :प्रत्येक वेळेस हा विषय चर्चेला येतो अंतिम कार्यवाही होत नाही.पटपडताळणी अहवाल नुसार २०-२५ शाळा आजही बंद करू शकतो ११७ अतिरिक्त शिक्षक मिळू शकतात त्याचा विचार करावा.अतिरिक्त जे शिक्षक होतील त्यातून पात्र असलेले शिक्षक हे ८ते १० वीच्या विदयार्थ्यांना शिकविण्यासाठी घे्ता येईल विदयार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.स्थानिक संस्थेची जबाबदारी ही ६-१४ वयोगटातील मुलांना शिक्षण देणेपुरतीच असते पुढील वर्ग चालविण्यासाठी महापालिकेची आर्थीक परीस्थिती तशी नाही त्यासाठी विदयार्थी नसलेल्या शाळा बंद करून तेथील अतिरिक्त पात्र शिक्षक या विदयार्थ्यांना शिकविण्यासाठी देण्यात यावे.विदयार्थ्याचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे.

श्री.गिरजाराम हळनोर :अहवाल आलेला आहे जे दोषी आहेत त्यांचा शोध घेवून कार्यवाही होत राहिल अतिरिक्त शिक्षक जे शिकविण्यास पात्र आहे अशा शिक्षकांना या ठिकाणी देण्यात यावे शैक्षणिक नुकसान त्या विदयाथ्याचे होवू नये.

मा.महापौर :पटपडताळणीनुसार अनेक शाळामध्ये विदयार्थी नाही अतिरिक्त शिक्षक आहे बराच वेळ चर्चा झाली जो अहवाल आला तो समाधानकारक नाही. येणा-या बैठकीपर्यत मा.आयुक्तांनी योग्य तो निर्णय घेवून ३४ शिक्षकाच्या बाबतीत त्यांना योग्य तो न्याय दयावा असे आदेशीत करण्यात येते.अतिरिक्त शिक्षका विषयी ही योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.संजय चौकधी :चौकशी समितीचा अहवाल आला त्यात दोषी कोण दिले नाही तो ही अहवाल देण्याचे आदेशीत करावे.

श्री.सुर्यकांत जायभाये :जालना रोडच्या दक्षिण भागातील लोक शहरात येत असतांना मोंढानाका ते संस्थान गणपती या रस्त्याने येतात हा रस्ता ४ महिण्यापासून खराब झालेला आहे शहरात पॅचवर्क काम सुरू करण्यात आले या रस्त्यावरील खड्डे बुजवावे.

मा.महापौर :शहरातील खड्डे लवकरात लवकर बुजविण्यात यावे.

श्री.कृष्णा बनकर :नोकर भरतीची जाहिरात दिली परंतु जे महापालिकेच्या अस्थापनेवर दैनिक वेतनावर कर्मचारी आहे त्यांचा अगोदर विचार करावा.

श्री.गिरजाराम हळनोर :विषयपत्रिका घेण्यात यावी.

**विषय क्र. ५३१**

दिनांक ०८.०७.२०११ (दि.०७.०६.२०११ची तहकूब का.प.क्र.२२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री.गिरजाराम हळनोर : या विषयात त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे त्या बैठकीतही ठरवल होते की रॅमकी ही एजन्सी जाणार आहे.तर घनकचरा साठी त्यामध्ये पैसे ठेवण्यात यावे १३ व्या वित्त आयोगातले त्याच प्रमाणे समांतर जलवाहिनीसाठी पैसे लागणार आहे त्यासाठीही रक्कम ठेवावी आणि उर्वरीत रक्कम ही शहराच्या विकासासाठी ठेवावी

मा.महापौर :मंजूर

श्री.प्रिती तोतला :प्रत्येक सभेत मागिल बैठकीचे इतिवृत्त दयायला पाहिजे यात ४-५ महिण्यापूर्वीचे इतिवृत्त दिले आहे मागिल बैठकीत काय विषय झाले ठराव झाले आम्हाला कळत नाही.या बाबत विचार करावा.

मा.महापौर :या बाबतीत विचार केला जाईल.

**ठराव :**

दिनांक ०८.०७.२०११ (दि.०७.०६.२०११ची तहकूब का.प.क्र.२२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५३२:**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे पत्र जाक्र/मनपा/आस्था-१/२०११/१६३५ दिनांक ११.११.२०११ विविध संवर्गातील एकुण १२४ रिक्त पदे भरणे बाबत. (सोबत प्रत सहपत्रासह जोडली आहे.)

डॉ.जफर खॉन :१२४ रिक्त पदे भरणार आहोत यात अनुशेष मधील राखीव व ओपन मधील किती पदे आहे खुलासा घ्यावा.

श्रीमती प्रिती तोतला :या भरती प्रक्रियेला मागिल बेठकीत स्थगिती दिली होती परंतु मा.आयुक्त यांना शासनाकडून ही भरती ३१ डिसेंबर पर्यंत भरण्याचे आदेश आहे. महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नाही असे वारंवार सांगितले जाते. दैनिक वेतनावर कर्मचारी असून त्यांना ५० टक्के वेतन आजही दिले जाते ही भरती करतांना अगोदर त्यांचा विचार करावा.

श्री.कृष्णा बनकर :या भरतीमध्ये वाहनचालक व इतर पदाची भरती होत आहे. या पदावर दैनिक वेतनावरी कर्मचारी यांचा अगोदर विचार व्हावा त्यानंतर बाहेरील उमेदवार घ्यावे.

श्री.संजय केनेकर :शासनाचे अनुशेष भरती करणे विषयी पत्र आहे कोणता अनुशेष भरावयाचा आहे अनुशेषची राखीव पदे किती आहे मागिल बैठकीत या भरतीला स्थगिती दिली होती हा प्रस्ताव आला याची कल्पना आपणांला दिली होती का?सर्वसाधारण सभेने स्थगिती दिली होती ती उठविली का सर्व खुलासा करावा.

अस्थापना अधिकारी-१ :मागिल बैठकीत १२४ पदाच्या भरती संदर्भात चर्चा होवून ही भरती करू नये असे सभागृहाने सांगितले होते.१२४ पदाची जाहिरात दिली त्यापैकी ७९ पदे मागासवर्गीय अनुशेष मधील असून ४५ पदे ही खुल्या संवर्गातील आहे.ऑगस्ट मध्ये शासनाने अनुशेष मधील पदे ३१ डिसेंबर ११ पर्यत प्रोग्राम दिला ही पदे तातडीने भरावी व शासनला अहवाल

कळवावा असे म्हटले आहे.त्याअनुषंगाने सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ हे सादर केले आहे.

श्री.संजय केनेकर :मा.सर्वसाधारण सभेने यास स्थागिती दिली होती हे ठेवतातना मा.आयुक्तांच्या निदर्शणास आणून दिले का ?शासनाकउील पत्र आलेले मा.महापौरांना निदर्शनास आणून दिले का ?

अस्थापना अधि.-१ :या सोबत दिलेले आहे.

मा.महापौर :पत्र आलेले आहे परंतु हा प्रस्ताव ठेवण्यात येईल हे आलेले नाही.

श्री.संजय केनेकर :प्रस्ताव ठेवणार हे मा.महापौरांना कळविले नाही.प्रशासनाला प्रस्ताव महत्वाचा वाटते त्ेवढाच सभागृहालाही महत्वाचा आहे.

अस्थापना अधि-१ :माहितीसाठी सभागृहासमोर दिले आहे त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.संजय केनेकर :२०-२० वर्षापासून दै.वेतनावर सेवा करणारे कर्मचारी यांचा विचार करावा अनुशेष ची पदे भरण्याचे शासनाचे निर्देश आहे. महापालिका कोणत्या स्थितीत आहे. दोन-दोन महिणे पगार होत नाही, कर्मचा-यांचे पीएफची रक्कम भरली जात नाही दै.वेतन कर्मचा-याची संचिका लेखा विभागात जाते १२४ पदाची भरती करतांना खर्चा बाबत ती संचिका लेखा विभागात गेली होती का भरती करतांना जर महापालिकेच्या नागरीकाच्या हिताचा निर्णय सभागृह घेईल तो शासनाला लागू करावा लागेल.

श्री.संजय केनेकर :शासनाचे पत्रानुसार किती पदे भरावी लागणार बाहेरील किती मनपातील किती भरता येतात या विषयी मा.महापौराना माहिती दयायला पाहिजे होती.

श्रीमती प्रिती तोतला :शासनाच्या पत्रानुसार ७९ अनुशेष मधील पदे भरावी. १२४ मंजूरी मागीतली तसे होवू नये आरसीएच सारखा प्रकार होवू नये.

श्री.संजय केनेकर :अनुशेष भरती करतांना येथे कारर्यत दै.वेतन कर्मचारी यांचा विचार करावा त्यांना कामाचा अनुभव आहे तसेच ५० टक्के ऑलरेडी पेमेंन्ट आपण त्यांना देतो महापालिकेच्या फायदयाचे ठरेल.आर्थीक स्थिती खराब आहे हे शासनाला कळवू शकतो.

मा.उपमहापौर :अदांजपत्रक असेल तर खर्चा बाबत अनेक विभागात संचिका जाते. हा विषय दोन ओळीत दिला १२४ पदे भरावयाची आहे आर्थीक खर्च वाढणार आहे शासनाचे जे पत्र आहे त्यानुसार सविस्तर प्रस्ताव यायला पाहिजे होता प्रशासनाचे त्यात मत काय आहे हे यायला पाहिजे दैनिक वेतनावर कर्मचारी आहे त्यांचे बाबतीत काय निर्णय धेणार हा नेहमीचा विषय येतो.दै.वेतनावरील कर्मचारी सेवानिवृत्तीचे वयापर्यंत गेले याबध्दल सहानुभूती का वाटत नाही.प्रशासनाकडून सविस्तर माहिती सह प्रस्ताव यावा ही भावना सर्वांची आहे. ७९ अनुशेष मधील पदे भरतांना दै.वेतनावर त्यातील किती कर्मचारी येतात असेल तर त्यांना प्राधान्य दयावे सभागृहा समोर तसे आणावे उर्वरीत पदे भरण्या बाबत कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सभेपूढे सादर करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :शासनाच्या पत्रानुसार अनुशेषची जी ७९ पदे भरायची व शासनाला अहवाल दयायचा आहे याचा अर्थ ७९ पदाची भरती करावीच लागेल.१२४ पदे एकूण रिक्त आहे. १६८ कर्मचारी दै.वेतनावर आहे यातील किती कर्मचारी १२४ मधील रिक्त पदामध्ये बसू शकतात याचा अभ्यास करण्याची गरज आहे.जेव्हा अनुशेषची पदे भरता तेव्हा जे त्यात वेटींगवर येतात त्यांचा विचार झाला पाहिजे.शासनाची मान्यता नसतांना जास्तीची भरती कोणी केली ,कोणाचे नातेवाईक आहे का,त्यावेळी त्या कर्मचा-याचे वय, शिक्षण होते का याची शहानिशा होण्याची गरज आहे.

मा.महापौर :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून सदर पदाची भरती करतांना प्रथम प्राधान्य दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना देण्यात यावे.त्याचा विचार करण्यात यावा मग भरती प्रक्रिया करावी.पुढील सभेत अहवाल आणावा आणि नंतर भरती प्रक्रिया करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध संवर्गातील १२४ पदांची भरती करण्यास मंजुरी देण्यातयेते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर भरती करतांना दैनिक वेतन कर्मचारी यांना प्रथम प्राधान्य देण्यास व भरती बाबत अहवाल सादर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३३:**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे नक्षत्रवाडी येथील गट क्रमांक ११४/१ मधील ५७ आर क्षेत्रासाठी श्री.अनिल शांतीलाल सिसोदीया व इतर यांनी विधिज्ञ श्री. शरद एस. हालकुडे यांच्या मार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नूसार दिनांक ०६/०८/२०११ रोजी खरेदी सूचना महानगरपालिकेस तामील केली आहे.

सदर गट क्रमांक ११४ मध्ये १९९१ चे विकास योजने नूसार आरक्षण क्रमांक S१/D बगीचा असे असून अर्जदार यांनी त्यांच्या खरेदी सूचने सोबत जोडलेल्या मोजणी नकाशानूसार त्यांचे क्षेत्र या आरक्षणाने बाधीत होते. सदर भूखंड असलेली विकास योजना मंजुर होऊन १० वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला असल्याने त्यांची खरेदी सूचना विधिग्राहय ठरते. त्यामुळे विहीत मुदतीत सदर भूखंडाच्या आरक्षणाचे भूसंपादनाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

वरील बाब लक्षात घेता अर्जदार यांचे ७/१२ वरील नोंदी नूसार असलेले ५७ आर एवढया क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही करणेचा प्रस्ताव दाखल करण्यात येत आहे. याठिकाणी सिध्द शिघ्र गणक दर २०११ नूसार रु. २२००/- प्रति चौ.मी. एवढा दर असून भूसंपादनाचा अंदाजे खर्च रु. १,२५,४०,०००/- एवढा अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्ष भूसंपादन कार्यवाही करतांना यात बदल होऊ शकतो. त्यामुळे जो काही खर्च भूसंपादन अधिकारी हिशोबीत करतील त्या खर्चासह भूसंपादन कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गिरजाराम हाळनोर : १२७ ची नोटीस जमीन मालकाने दिली आहे त्यामुळे भुसंपादनाची कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे परंतु असे अनेक प्रकरणे आहेत जर प्रत्येकाची नोटीस आली तर एवढा पैसा उभा करू शकतो का,त्यासाठी जे कुणी जमिन मालक आहे त्याचेशी अगोदर बोलणी

करावी त्यांनी टीडीआर किंवा एफएसआय ॲक्सेप्ट केला तर तो देण्यात यावा हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.मिर हिदायत अली :१२७ च्या किती नोटीसा आहेत. येणाऱ्या सभेत ठेवावे.

मा.महापौर :१२७ ची नोटीसची अशी किती प्रकरणे आहे यासह ते येणा-या सभेत सविस्तर ठेवण्यात यावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६चे कलम १२७ अन्वये प्राप्त झालेल्या सर्व नोटीसांची प्रकरणे या प्रस्तावासह येणा-या सर्वसाधारण सभेत सविस्तरपणे ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद शहरात कुठेही मासळी बाजार(Fish Market)नसल्याने शहरात विविध ठिकाणी रस्त्यावर मासळी विक्री होत असल्याने शहरात बायजीपुरा भागातील सेंट्रल जकात नाका लगत,गारखेडा साईनगर परीसरात व रेल्वेस्टेशन परीसरात महानगरपालिकेच्या उपलब्ध जागेवर मासळी बाजार(Fish Market)बांधणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला असता विषय क्रं.१२९ दिनांक २०.१२.२०१० अन्वये त्यास मंजुरी प्राप्त झालेली होती.

मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीन्वये शासनाकडे या संदर्भाने आर्थिक अनुदान उपलब्धते बाबत विचारणा करण्यात आली असता राज्य शासनाच्या कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचे कडील पत्र क्रं/मत्स्य आ/२०११/प्र.क्रं/६०/पदुम १२ दिनांक ७.३.२०११ अन्वये राष्ट्रीय मत्स्यविकास महामंडळाच्या सहाय्याने महानगरपालिका हददीत अद्यावत मासळी बाजार(Fish Market)बांधणे बाबत महानगरपालिकेस मार्गदर्शक सुचना केलेल्या आहेत.

सदर मासळी बाजार बांधणेच्या प्रकल्पासाठी राष्ट्रीय मत्स्य विकास बोर्ड(N.F.D.B.)हैद्राबाद,यांचे कडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या ९० % अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

तसेच उर्वरीत १० % लागणारा हिस्सा महानगरपालीकेच्या भाग भांडवलातुन उभारावयाचा असल्याने तसेच शासन मार्गदर्शक तत्वानुसार सेंट्रल नाका परीसरात मनपाच्या सिटी सर्व्हे न.१२०४१ मधिल १ एकर उपलब्ध जागेवर रिटेल फिश मार्केट उभारणेस व चिकलठाणा परीसरात मनपाच्या उपलब्ध जागेवर होलसेल फिश मार्केट उभारणेस,एकुण प्रकल्प खर्चाच्या १० टक्के रक्कम मनपा भागभांडवलातुन भरणेस,प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रकल्प दिर्घकाळ चालु राहणेसाठी व स्वच्छतांच्या नियमांचे पालन होणेसाठी मत्स्य विकास महामंडळा मार्फत वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचना अटी व शर्ती व कार्य पध्दतीचे पालन करणेबाबतच्या सर्व अटी व शर्ती औरंगाबाद महानगरपालिकेस मंजुर असल्या बाबत संबधित खात्यास कळविणे बाबतच्या सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला असता ठराव क्रं.३६४ दिनांक ८.७.२०११(का.प.क्रं.२२ दिनांक ७.६.२०११ ची तहकुब सभा) अन्वये मा.सर्वसाधारण सभेने प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीन्वये शासन मार्गदर्शक तत्वानुसार सेंट्रल नाका परीसरात मनपाच्या सिटी सर्व्हे न.१२०४१ मधिल १ एकर उपलब्ध जागेवर रिटेल फिश मार्केट उभारणे

बाबतचा रक्कम रुपये १८४.५९ लक्षचा विस्तृत प्रकल्प अहवाल(DPR)राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड(NFDB)यांचे कडे सादर करण्यात आला असता राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड(NFDB) यांनी दिनांक १४.९.२०११ अन्वये प्रकल्प प्रस्तावास व एकुण प्रकल्प किंमतीच्या (१८४.५९ लक्ष)९०% अनुदान रक्कम रुपये १६६.१३ लक्षास अटी व शर्तीसह मंजुरी दिलेली आहे.

राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड(NFDB) यांचे कडुन मंजुर अनुदानापैकी रक्कम रुपये १५.००लक्षचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले असुन उर्वरीत अनुदान मासळी बाजाराचे काम प्रगतीपथावर असतांना कामाच्या प्रत्येक टप्प्यावरील कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र बोर्डास सादर केल्यानंतर त्या प्रमाणात आर्थिक अनुदान महानगरपालिकेस दिनांक १४.९.२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध होणार आहे.

करीता वरील बाबी नुसार शहरातील सेंट्रल नाका परीसरात मनपाच्या सिटी सर्व्हे न.१२०४१ मधिल १ एकर उपलब्ध जागेवर रिटेल फिश मार्केट उभारणे बाबतचा रक्कम रुपये १८४.५९ च्या अंदाजपत्रकाचा, प्रकल्प प्रस्तावासाठी उर्वरीत १० % आर्थिक तरतुद रक्कम रुपये १८.४५ लक्ष तरतुद तसेच प्रकल्पाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्तीची आल्यास त्याबाबतचा अतिरीक्त खर्चाची आर्थिक तरतुद महानगरपालिकेस करणे बाबतचा,राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड(NFDB) यांचे दिनांक १४.९.२०११ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करणे बाबतचा,प्रकल्पासाठी स्वतंत्र लेखाशिर्षासह बॅक खाते उघडण्याचा,प्रकल्पासाठी महानगरपालिका पॅनल वरील नियुक्त वास्तुविशारद यांची रितसर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार(PMC)म्हणुन नियुक्ती करणे बाबतचा व प्रकल्प संदर्भाने् वेळोवेळी प्राप्त सुचनेनुसार कार्यवाही करणे बाबत आयुक्त महानगरपालिका,यांना अधिकार प्रदान करणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

| | |
|---|---|
| श्री.नारायण कुचे | :मुकूंदवाडी येथेही अनाधिकृत फिश मार्केट आहे. तेथेही याप्रमाणे फिश मार्केट करण्यात यावे. |
| मा.महापौर | :मुकूंदवाडीमध्येही फिश मार्केट करण्यात यावे. दुरूस्तीसह मंजूर. |
| श्री.कृष्णा बनकर | :ज्या ज्या वार्डात फिश मार्केट पाहिजे तेथे करण्यात यावे. |

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे कडील पत्र क्रं/मत्स्य आ/२०११/प्र.क्रं/६०/पदुम १२ दिनांक ७.३.२०११ अन्वये राष्ट्रीय मत्स्यविकास महामंडळाच्या सहाय्याने महानगरपालिका हददीत अद्यावत मासळी बाजार(Fish Market)बांधणे बाबत प्रस्तावात नमुद मार्गदर्शक सुचने नुसार सिटी सर्व्हे न.१२०४१ मधिल १ एकर उपलब्ध जागेवर फिश मार्केट उभारणेस व रिटेल फिश मार्केट उभारणे बाबतचा रक्कम रुपये १८४.५९ च्या अंदाजपत्रकाचा, प्रकल्प प्रस्तावासाठी उर्वरीत १० % आर्थिक तरतुद रक्कम रुपये १८.४५ लक्ष तरतुद तसेच प्रकल्पाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्तीची आल्यास त्याबाबतचा अतिरीक्त खर्चाची आर्थिक तरतुद महानगरपालिकेस करणेस तसेच राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड (NFDB) यांचे दिनांक १४.९.२०११ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करणे व प्रकल्पासाठी स्वतंत्र लेखाशिर्षासह बॅक खाते उघडण्याचा,प्रकल्पासाठी महानगरपालिका पॅनल वरील नियुक्त वास्तुविशारद यांची रितसर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार(PMC)म्हणुन नियुक्ती करणेस व प्रकल्प संदर्भाने् वेळोवेळी प्राप्त

सुचनेनुसार कार्यवाही करणेस आयुक्त,महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करणेस तसेच मुकूंदवाडीमध्येही फिश मार्केट करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५ :**

मा.आयुक्त महोदय, यांचे मंजुरी नुसार प्रभाग अधिकारी, प्रभाग -ई मार्फत प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री. मिर्झा साजेद मिर्झा हमीद बेग, कनिष्ठ लिपीक प्रभाग ई, यांनी त्यांचे स्वत:चे ह्दय रोगावर शासनमान्य धुत हॉस्पीटल, औरंगाबाद व महात्मा गांधी हॉस्पिटल, औरंगाबाद येथे उपचार केलेले आहे. शासनमान्य धुत हॉस्पीटल येथे त्यांच्या उपचारावर रक्कम रुपये ३०,५९२/- च्या खर्चास मा.आयुक्त यांची मान्यता मिळालेली असुन महात्मा गांधी खाजगी हॉस्पीटल येथे झालेल्या उपचारावरील एकूण खर्च रक्कम रुपये १,४२,०००/- (एक लाख बेचाळीस हजार रुपये मात्र) एक विशेष बाब म्हणून मंजूर करण्याकरीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवत आहे.

करीता श्री.मिर्झा साजेद मिर्झा हमीद बेग, कनिष्ठ लिपीक प्रभाग-ई यांनी स्वत:चे आजारावरील उपचारा करीता केलेला खर्च एकूण रक्कम रुपये १,४२,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गिरजाराम हाळनोर :वैद्यकीय उपचाराचा खर्चा बाबत आहे मंजूर करावे

मा.महापौर :मंजूर

श्री.संजय केनेकर :कर्मचा-याचा मृत्यू होतो त्यांना वैद्यकीय खर्च वेळेवर दिला जात नाही अशी किती प्रकरणे आहे त्या कर्मचा-यांनी आर्थीक मदतीची मागणीचा अर्ज केव्हा दिला होता खुलासा घ्यावा एक वाहन चालक यांचे पैसे नव्हते त्यामुळे मृत्यू झाला वेळेवर त्यांना मदत झाली नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी:श्री.अंबादास गायकवाड यांची संचिका माझ्याकडे २३-११-२०११ रोजी आलेली होती मी लगेच १० मिनीटात शिफारस करून लेखा विभागाकडे पाठविली होती तेंव्हा पासून ती प्रलंबीत आहे.

श्री.संजय केनेकर :अशी किती प्रकरणे आहेत.

प्र.आरोग्यवैद्य.अधिकारी : फेब्रुवारी पासून प्रकरणे प्रलंबीत होती समीती नेमून ५० प्रकरणे निकाली काढली आहे. व संबधीत विभागाकडे पाठविली आहे सध्या माझेकडे प्रकरणे नाही.फेब्रुवारी पासून ५० संचिका होत्या त्या सर्व संचिका मी चार्ज घेतल्यापासून निकाली काढल्या आहेत.या बाबतीतली संचिका २४-११-२०११ रोजी लेखा विभागाकडे पाठविली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे श्री मिर्झा साजेद मिर्झा हमीद बेग, कनिष्ठ लिपीक प्रभाग ई, यांना त्यांचे स्वत:चे ह्दय रोग उपचारावरील एकूण खर्च रक्कम रुपये १,४२,०००/- (एक लाख बेचाळीस हजार रुपये मात्र) च्या खर्चास विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.५३६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहाबाजार चंपाचौक लगत सन १९७६ साली म्हाडा तर्फे मागासवर्गीय नागरिकांकरीता घरे / वसाहत बांधली होती. सदर ठिकाणी मागासवर्गीय

समाजाचे जे नागरीक राहत होते त्यांनी त्या ठिकाणी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करुन त्यास भिमसंदेश कॉलनी असे नाव ठेवले होते. म्हाडातर्फे या योजनेत ठेवलेल्या खुल्या जागेत स्थानिक नागरीकांनी तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळे सिमेंट कॉक्रीटच्या चबुतऱ्यावर सन १९७६ साली बसविल्याचे त्या ठिकाणी असलेल्या कोनशिलेवरुन प्रथमदर्शनी दिसुन येते.

जिन्सी पोलीस स्टेशन वरीष्ठ पोलीस निरिक्षक यांनी दिनांक १३.०७.२०११ च्या पत्रान्वये कळविले आहे की, तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळे बसविणारे सर्व मागासवर्गीय नागरीक तेथील घरे विकुन इतरत्र गेलेले असल्यामुळे पुतळयाचा सांभाळ/देखरेखसाठी कोणीही नाही, त्यामुळे या महापुरुषांच्या पुतळयांना विटंबना सारखे प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच सदर पुतळे जिर्ण झाले असून, पाऊस / ऊण व वाऱ्यामुळे त्यांची क्षती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब सदर पुतळे बौध्द लेणी येथे हलविण्याकरिता पुतळा संरक्षण समितीचे अध्यक्ष उत्तमराव शिंदे व जिन्सी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरिक्षक यांनी विनंती केली आहे. पुतळे हलविण्यास कोणाचीही हरकत नाही, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाही असे त्यांचे पत्रात नमुद केले आहे.

सदर महापुरुषांचे पुतळे बुध्द लेणी येथे स्थलांतरीत करणेसाठी शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार शासनाची परवानगी, शहर पोलीस आयुक्त यांची मंजुरी, मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी, भविष्यात पुतळा सांभाळण्याची / पुतळयाची मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी संबंधीताने देणे, मा.जिल्हाधिकारी कार्यालयाचे अभिप्राय घेणे इत्यादि प्रदिर्घ कार्यवाही होणे आवश्यक असून, सदर कार्यवाहीसाठी खुप वेळ लागणार आहे. त्यामुळे अस्तित्वातील महापुरुषांच्या पुतळयालगत यापूर्वी पुतळे पुर्नस्थापनेसाठी आर.सी.सी. फ्रेम मध्ये दोन खोल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. तसेच या पुतळयासमोर असलेली खुली जागेचे आणि या खोल्यांचे सुशोभीकरण करुन पुतळे त्याच ठिकाणी स्थलांतरीत करुन ठेवल्यास पुतळयांचे संरक्षण, देखभाल करणे शक्य होईल व खुल्या जागेत सामाजीक कार्य जसे निरास्त्रीतांसाठी निवारा, रात्र निवारा इत्यादी सामाजीक हितांचे कार्य पार पाडता येऊ शकेल.

करीता म्हाडा कॉलनी येथील तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्तित्वातील पुतळयांचे त्याच ठिकाणी असलेल्या आर.सी.सी.बांधकामाच्या खोल्यांमध्ये पुर्नस्थापीत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

शहर अभियंता :या प्रस्तावात आर.सी.सी बांधकामाच्या खोल्यामध्ये पुर्नस्थापीत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ असे म्हटले त्या ऐवजी औरंगाबाद लेणीच्या ठिकाणी नेवून चांगल्या प्रकारे ठेवावे असा त्यात बदल करावा

मा.महापौर :दुरुस्तीसह मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहाबाजार चंपाचौक लगतच्या म्हाडा कॉलनी येथील तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्तित्वातील पुतळयांचे त्याच ठिकाणी असलेल्या आर.सी.सी.बांधकामाच्या खोल्यांमध्ये पुर्नस्थापीत करण्याऐवजी औरंगाबाद लेणीच्या ठिकाणी नेऊन चांगल्या प्रकारे ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम संग्रहालयाचे बांधकाम करणे करीता रक्कम रुपये १,९७,२८,९३७/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०११-१२ च्या जिल्हा दरसुची नुसार वास्तुविशारद श्री.सुनील राका यांच्या कडुन प्रकल्प किमंतीच्या १.५ टक्के दरानुसार तयार करुन घेण्यात आलेले आहे.

सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.४७९ दिनांक २९.०९.२०११ नुसार मंजुरी दिलेली आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीन्वये सदर कामासाठी निविदा सुचना जा.क्र.मनपा/शअ/२०११/५४९ दिनांक १०.१०.२०११ अन्वये ई-निविदा विभागामार्फत रितसर निविदा मागविण्यात आल्या असता ई-निविदा विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकुण तीन (३) निविदा विक्री झालेल्या आहेत तसेच निविदा स्विकृती अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन (३) निविदा दर भरुन प्राप्त झालेल्या आहे.

प्राप्त निविदा दरा बाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ड्रीमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन | - | १.१% कमी दराने |
| २. | श्रीया सिव्हील इंजिनिअर्स प्रा.लि. | - | ४.६५% जास्त दराने |
| ३. | अंजीरा बिडकॉन प्रा.लि. | - | १०.५% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा दरा पैकी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१% कमी दराचे निविदा दर हे मे.ड्रीमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन यांचे आहे.

करीता मे.ड्रीमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन यांचे १.१% कमी दराचे निविदा दर तसेच सदरील कामाचे अंदाजपत्रक वास्तुविशारद श्री.सुनील राका यांच्या कडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या १.५ टक्के दराने करुन घेण्यास मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :-**

| | |
|---|---|
| श्री.अफसर खान | :यास विरोध नाही. आर्थीक परिस्थिती बघता २-५ लक्षचे काम होत नाही एवढी मोठी रक्कम देऊन काम सुरू करणार हे योग्य नाही. नंतर करावे. |
| मा.महापौर | :मंजूर |
| श्री.संजय केनेकर | :वास्तुविशारद आपल्याकडे आहे. यात नमुद केल्याप्रमाणे त्यांना १५-२० लक्ष का देतो. सद्या आपल्याकडे पैसे नाही. याचा विचार व्हावा |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम संग्रहालयाचे बांधकाम करणेसाठी मे.ड्रीमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन यांचे १.१% कमी दराचे निविदा दर तसेच सदरील कामाचे अंदाजपत्रक वास्तुविशारद श्री.सुनील राका यांच्या कडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या १.५ टक्के दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती आणि विशेष समित्यांचे कार्यक्रम पत्रिका कुरिअर तर्फे वाटण्यात येत होती. कुरिअर वाल्यांना दर परवडत नव्हते व वेळेवर कार्यक्रम पत्रिका स.पालिका सदस्यांना पोहचवता येत नसे. इत्यादि कारणावरुन मागील एक दोन वर्षापासून कार्यक्रम पत्रिका कर्मचाऱ्यामार्फत वितरीत

केली जाते कुरिअर कडून टपाल वितरणाची निविदा काढल्यावर प्रतीसाद मिळतनाही फेर निविदा साठी जाहिरातीचा खर्चच सुमारे रु.८०००/- पर्यंत येतो तसेच कुरिअर तर्फे किमान खर्च खालील प्रमाणे होतो.

| | | |
|---|---|---|
| सर्वसाधारण सभा मुळ विषय पत्रिका + पुरवणी | १०४ + १०४ | = २०८ |
| स्थायी समिती सभा किमान ३ वेळा १६+३ | | = ४८ |
| विशेष समित्या इत्यादी ९ X ५ | | = ४५ |
| व इतर | | = ५० |
| | **एकुण टपाल** | **३५१** |

किमान ३०५ टपाल धरले तरी ३०५ X ५.५० = रु.१६७७ व स्वातंत्र दिन,प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिवस, वर्धापन दिवस इत्यादिंचा विचार केल्यास प्रती महा रु.२०००/- पेक्षा जास्त (सरासरी) खर्च अपेक्षित आहे. कुरिअरचा वार्षिक रु. ८०००/- ते १०,०००/- जाहिरातीचा खर्च वेगळा येतो. कुरिअरकडून टपाल वाटपाची पोच वेळेवर प्राप्त होत नाही.

करीता वरील प्रमाणे कामे श्री.शिवराम रमंडवाल,जवान/नाईक यांचेकडून करुन घेण्यात येते, टपालासाठी १३९.७५ चौ.किमी क्षेत्रास व मुदतीत वाटप करावे लागते तरी वरील बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या खर्चात काटकसर होण्याच्या दृष्टीकोनातून श्री.शिवराम रमंडवाल जवान/नाईक याचेकडून सदरील काम करुन घेण्यासाठी त्यास रु. ८००/- प्रती महा वाहन / इंधन भत्ता मंजुर करणेस हरकत नाही. तसेच श्री.शिवराम रमंडवाल उपलब्ध न झाल्यास जो शिपाई सदरील टपाल वाटप करेल त्यास रु. ८००/- प्रती महा वाहन / इंधन भत्ता मंजुर करणेस हरकत नाही.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय क्र.५३८ ते ५६५ मंजुर.

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती आणि विशेष समित्यांचे कार्यक्रम पत्रिका मुदतीत वाटप करण्याकरीता व महानगरपालिकेच्या खर्चात काटकसर होण्याच्या दृष्टीकोणातुन श्री.शिवराम रमंडवाल जवान/नाईक याचेकडून एप्रिल २०१० पासून सदरील काम करुन घेत असल्याने त्यांना रु. ८००/- प्रती महा वाहन / इंधन भत्ता वरील तारखेपासून मंजुर करणेस तसेच श्री.शिवराम रमंडवाल उपलब्ध न झाल्यास जो शिपाई सदरील टपाल वाटप करेल त्यास रु. ८००/- प्रती महा वाहन / इंधन भत्ता मंजुर करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५३९:</u>**

प्रस्ताव:वार्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील सिध्देशनगर येथील मनपाचे सभागृह सिध्देशनगर सांस्कृतिक व क्रिडा मंडळ यांना भाडे तत्वावर देण्यात यावे. या करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.रेणुकादास (राजु) वैद्य		अनुमोदक :श्री.सुरेंद्र कुलकर्णी, श्री.तुपे त्र्यंबक

**<u>ठराव</u> :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील सिध्देशनगर येथील मनपाचे सभागृह सिध्देशनगर सांस्कृतिक व क्रिडा मंडळ यांना नियमाप्रमाणे भाडे तत्वावर देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला किराडपुरा येथील मदनी चौकात काल दिनांक १४-११-२०११ रोजी रात्री लागलेल्या आगीत अहेमद इश्तियाक व त्यांच्या पत्नीचे निधन झालेले असुन कुंटुबातील इतर सदस्य गंभीर जख्मी झालेले आहेत.

या आगीतील मृत्यांना प्रत्येकी ०१ लाख रुपये व जख्मीना प्रत्येकी २५ हजार रुपये महानगरपालिका तर्फे आर्थिक मदत म्हणुन देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक:श्री.शेख अब्दुल असद,श्री.मुजीब आलम खान,श्री.मिर हिदायत अली,
श्री.रावसाहेब गायकवाड, श्री.समीर राजुरकर, श्री.आनंद घोडेले, श्री. नासेर खान,
श्री.खाजा शरफोद्दीन,श्री.संजय केनेकर

अनुमोदक :डॉ.जफर अहेमद, श्री.अफसर खान, श्री.प्रमोद राठोड, श्री.काशिनाथ कोकाटे,
श्री.मिलींद दाभाडे, श्री.शहनवाज खान, श्री.मो.मुजीबउद्दीन

संवाद :

श्री.संजय केनेकर : विष्णूनगर भागातही श्री. कुलकर्णी यांचे घराला आग लागून तेही जखमी आहे त्यांनाही ५० हजार रू. आर्थीक मदत देण्यात यावी.

श्री.गिरजाराम हळनोर: स.सदस्य श्री. केनेकर यांचे वार्डात गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन नुकसान झालेले आहे त्या कूटूंबाना सुध्दा ५० हजाराची आर्थीक मदत करावी.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो तसेच विष्णूनगर येथील वयोवृध्द इसम श्री. गोविंदराव कुलकर्णी यांचे आग लागून नुकसान झाले आहे त्यांनाही ५० हजाराची मदत देण्यात यावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोहल्ला किराडपुरा येथील मदनी चौकात काल दिनांक १४-११-२०११ रोजी रात्री लागलेल्या आगीत अहेमद इश्तियाक व त्यांच्या पत्नीचे निधन झालेले असुन कुंटुबातील इतर सदस्य गंभीर जख्मी झालेले असल्याने या आगीतील मृत्यांना प्रत्येकी ०१ लाख रुपये व जख्मीना प्रत्येकी २५ हजार रुपये महानगरपालिका तर्फे आर्थिक मदत देण्यास तसेच विष्णूनगर येथील वयोवृध्द इसम श्री. गोविंदराव कुलकर्णी यांचे आग लागून नुकसान झाले आहे त्यांनाही ५० हजाराची मदत नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७९ मुकुंदवाडी या वॉर्डसाठी अर्थसंकल्प सन २०११-२०१२ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| पा.क्र.व.अ.क्र. | कामाचे नांव (जूने लेखाशिर्ष) | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १.वार्ड इ अंतर्गत २०११-१२ करिता W-E-New W-44 | वॉर्ड क्र. ७९ मुकुंदवाडी स्मशान भुमी दुरुस्ती करणे. र.रु. १० लक्ष (रद्द करणे)<br>स्माशान भुमी विकास अनु क्र.४ | वॉर्ड क्र.७९ मुकुंदवाडी गाव येथे सभामंडप बांधणे ६.०० लक्ष (महादेव मंदिर जवळ) |
| | | वॉर्ड क्र.७९ मुकुंदवाडी मध्ये भत्ती चौक येथील रस्ता |

| | | |
|---|---|---|
| | | कॉक्रीट करणे र.रु.४.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र. ७९ मुकुंदवाडी मधील स्पीलओअर २००९-२०१० मधील अर्थसंकल्प डांबरीकरण कामे मंजुर आहे ती रद्द करणे. र.रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र.७९ मुकुंदवाडी मध्ये विविध ठिकाणी कॉक्रेटी करण करणे र.रु. ५.०० लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.नारायण कुचे अनुमोदक : श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७९ मुकुंदवाडी या वॉर्डसाठी अर्थसंकल्प सन २०११-२०१२ मध्ये खालील प्रमाणे ठेवण्यात आलेली तरतुद प्रस्तावित सुधारीत कामांसाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| पा.क्र.व.अ.क्र. | कामाचे नांव (जूने लेखाशिर्ष) | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १.वार्ड इ अंतर्गत २०११-१२ करिता W-E-New W-४४ | वॉर्ड क्र. ७९ मुकुंदवाडी स्मशान भुमी दुरुस्ती करणे. र.रु. १० लक्ष (रद्द करणे)<br>स्माशान भुमी विकास अनु क्र.४ | वॉर्ड क्र.७९ मुकुंदवाडी गाव येथे सभामंडप बांधणे ६.०० लक्ष (महादेव मंदिर जवळ) |
| | | वॉर्ड क्र.७९ मुकुंदवाडी मध्ये भत्ती चौक येथील रस्ता कॉक्रीट करणे र.रु.४.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र. ७९ मुकुंदवाडी मधील स्पीलओअर २००९-२०१० मधील अर्थसंकल्प डांबरीकरण कामे मंजुर आहे ती रद्द करणे. र.रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र.७९ मुकुंदवाडी मध्ये विविध ठिकाणी कॉक्रेटी करण करणे र.रु. ५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५४२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, काजी गौस मोहीयोद्दीन उर्फ जे.पी.सईद हे मोठे उर्दु कवि होते. उर्दु साहित्यीकांमध्ये त्यांना मानाचे स्थान होते. मौलाना आझाद हायस्कूल मध्ये मुख्याध्यापक म्हणून त्यांनी आपली सेवा बजावली. पर्शीयन भाषा जाणणाऱ्या मोजक्या नावामध्ये त्यांचे नांव अग्रस्थानी होते. त्यांना पर्शीयन भाषेचे "मौलवी" म्हणुन संबोधले जात असे. त्यांची कित्येक शिष्ये सध्या मोठया अधिकाराच्या पदावर विराजमान आहे. नवोदीत उर्दु कविंचे ते आशास्थान होते. सध्या उर्दु साहित्यामध्ये झळकणाऱ्या कित्येक साहित्यीकांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. मन मिळाऊ स्वभाव, विद्यार्थ्यामध्ये शिक्षणाबाबत गोडी निर्माण व्हावी अशा अध्यापक कलेमुळे ते विद्यार्थीप्रिय गुरुजी होते. त्यांचे कित्येक कविता संग्रह प्रसिध्द झाले. भारतातील उर्दु साहित्याच्या निरनिराळया कवि संमेलनात बहुभाषिक कवि संम्मेलनात, चर्चा सत्र आणि पर्शियन भाषेसंबधी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांनी शहराचे प्रतिनिधित्व केले. महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक निर्मिती मंडळात उर्दु भाषेच्या अभ्यासक्रम तयार करण्यासाठी देखील त्यांनी योगदान दिले.

पर्शियन भाषेच्या कित्येक पुस्तकांचे त्यांनी भाषांतर केले. म.न.पा.च्या मालकीच्या कित्येक जागेचे पर्शियन आणि उर्दु भाषेतील दस्तऐवजांचे भाषांतर करुन त्यांनी अधिकाऱ्यांना

साहय्य केले. उर्दु साहित्याच्या अनेक कार्यक्रमामध्ये कवि संम्मेलनामध्ये त्यांनी अध्यक्ष पद भुषविले शासकीय आणि साहित्याच्या विविध संस्थांकडून त्यांना गौरवण्यात आले.

जे.पी.सईद सारख्या मोठया साहित्यीकाचा आठवण राहावी आणि त्यांचे कार्य नवीन पीढीस सदैव स्मरणात राहावे या करिता सिटी क्लब चौक ते नेहरु भवन मौलाना आझाद हायस्कूल ते टाऊन हॉल समोरील रस्त्यास "जे.पी.सईद मार्ग" देणेसंबंधी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचक :डॉ.नुजहत तरन्नूम, श्री.मिर्झा सलीम बेग, श्री.शहनवाज खान, श्री.असद पटेल,
श्री.काशिनाथ कोकाटे, श्रीमती परविन कैसर खान, श्री.शेख खाजा शरफोद्दीन

अनुमोदक :श्री.मिर हिदायत अली, श्री. मुजीबखान मीर आलमखान,श्री.अफसर खान,
डॉ.जफर खान,श्री.गाझी जुबैर, श्रीमती जरीना म.जावेद, श्री.असद पटेल,
श्री.प्रमोद राठोड, श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिटी क्लब चौक ते नेहरु भवन मौलाना आझाद हायस्कूल ते टाऊन हॉल समोरील रस्त्यास "जे.पी.सईद मार्ग" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५४३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खालील प्रमाणे लेखाशिर्षक वळती करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा जेणेकरुन प्रभागातील नागरीकांची मागणी पूर्ण करता येणे शक्य होईल.

| अ.क्र. | प्रस्तावित लेखाशिर्ष | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र १४ रोजाबाग अंतर्गत खुल्या जागा विकसीत करणे (अर्थसंकल्प पान क्र वार्ड ब १६) विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण अ.क्र.३ वरील रक्कम रु. २.५० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र. १४ रोजाबाग अंतर्गत विविध ठिकाणी उर्जा बचत विद्युतीकरण करणे रक्कम रु.२.५० लक्ष |

सुचक :सौ.संगिता राजू अहिरे अनुमोदक : श्री.समीर राजूरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे खालील प्रमाणे लेखाशिर्षक वळती करणेस मंजुरी देण्यात येते .

| अ.क्र. | प्रस्तावित लेखाशिर्ष | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र १४ रोजाबाग अंतर्गत खुल्या जागा विकसीत करणे (अर्थसंकल्प पान क्र वार्ड ब १६) विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण अ.क्र.३ वरील रक्कम रु. २.५० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र. १४ रोजाबाग अंतर्गत विविध ठिकाणी उर्जा बचत विद्युतीकरण करणे रक्कम रु.२.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर एन-८ येथील आदीवासी वस्तीगृहाच्या शेजारी असलेल्या चौकास राजमाता जिजाऊ चौक असे नामकरण करण्यासाठी नागरीकांची मागणी होत आहे. नागरीकांची मागणी लक्षात घेता सदरील चौकास राजमाता जिजाऊ चौक असे नामकरण करण्याचा प्रस्तावास मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.प्राजक्ता मंगेश भाले

अनुमोदक :सौ.सविता संतोष सुरे, श्रीमती पुष्पा देविदास सलामपुरे

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ गणेशनगर एन-८ येथील आदीवासी वस्तीगृहाच्या शेजारी असलेल्या चौकास राजमाता जिजाऊ चौक असे नांव देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा हद्दीतील रोशनगेट ते आझाद चौक पर्यंत असलेला डी.पी. रोडला या भागातील सामाजिक कार्यकर्ते स्व.हाजी अब्दुल रहेमान यांचे नांव देण्यांत यावे तसेच रहेमानिया कॉलनीत असलेल्या चौकास रहेमानिया चौक असे नामकरण करण्यात यावे.

या भागातील गरीब लोकांना स्व.हाजी अब्दुल रहेमान यांनी त्यांच्या मालकीच्या जागेत राहण्यासाठी तथा उदारनिर्वाहसाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. करिता रोशनगेट ते आझाद चौक पर्यंत असलेला डी.पी.रोडला या भागातील सामाजिक कार्यकर्ते स्व.हाजी अब्दुल रहेमान स्ट्रीट असे नांव देण्यांस तथा रहेमानिया कॉलनीत असलेल्या चौकास रहेमानिया चौक असे नामकरण करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सविनय सादर.

सुचक :श्रीमती फिरदोस फातेमा खान, डॉ.खान जफर अहेमद, श्री.शे.अ.असद

अनुमोदक :श्री.मीर हिदायत अली, श्री.प्रमोद राठोड, श्री.रावसाहेब गायकवाड

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट ते आझाद चौक पर्यंत असलेला डी.पी.रोडला या भागातील सामाजिक कार्यकर्ते स्व.हाजी अब्दुल रहेमान स्ट्रीट असे नांव देण्यांस तथा रहेमानिया कॉलनीत असलेल्या चौकास रहेमानिया चौक असे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०१०-२०११ मनपाच्या अर्थसंकल्पात रेल्वेस्टेशन परिसरात पादचारी पुल बनविण्यासाठी रु. २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून ती रक्कम खालील प्रमाणे कामासाठी वळती करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| (१) | पेव्हर ब्लॉक कामासाठी | - १५ लक्ष |
| (२) | ड्रेनेज चेंबरवर ढापे टाकण्यासाठी | - ५ लक्ष |
| (३) | रस्त्यांचे कॉक्रीटीकरणासाठी | - ५ लक्ष |
| | | एकुण रु. २५ |

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :शेख खाजा शरफोद्दीन अनुमोदक : श्री.काशीनाथ कोकाटे, श्री.मीर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सन २०१०-२०११ मनपाच्या अर्थसंकल्पात रेल्वेस्टेशन परिसरात पादचारी पुल बनविण्यासाठी रु. २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून ती रक्कम खालील प्रमाणे कामासाठी वळती करण्यास मंजूरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| (१) | पेव्हर ब्लॉक कामासाठी | - १५ लक्ष |
| (२) | ड्रेनेज चेंबरवर ढापे टाकण्यासाठी | - ५ लक्ष |
| (३) | रस्त्यांचे कॉक्रीटीकरणासाठी | - ५ लक्ष |
| | | एकुण रु. २५ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अब्दुल रब चाऊस हैराँ हे प्रसिध्द कव्वाल व कवि होते. त्यांनी आंतराष्ट्रीय स्तरावर कव्वालीचे कार्यक्रम सादर करून भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांचा जन्म जगप्रसिध्द अजिंठा लेणीच्या कुशीत झाला असलातरी त्यांनी औरंगाबाद शहरातच वास्तव्य केले. राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यासाठी त्यांनी दिवंगत प्रंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत लाल किल्ल्यावर कार्यक्रम सादर केले.

केंद्र शासनाच्या अपना उत्वस कार्यक्रमात देखील त्यांनी आपल्या कलेचे प्रदर्शन केले. भारताबरोबरच त्यांनी परदेशात देखील आपल्या कलेचे दर्शन घडविले. गजाला-ए-गजल कविता संग्रहाची निर्मिती करून उर्दु साहित्यात देखील आपला ठसा उमटविला. नागपुर म.न.पा. तर्फे त्यांचा भव्य नागरी सत्कार देखील करण्यात आला. शासनातर्फे विविध मानपत्र ही त्यांना प्राप्त झालेली आहे. त्यांचे संपुर्ण जिवण त्यांनी कलेसाठी समर्पित केले. अशा प्रसिध्द कव्वाल आणि कविचे नाव रोशनगेट ते चंपा मस्जिद रस्त्यास दिल्यास त्यांच्या कार्याची ओळख नवीन पीढीस होईल.

करिता रोशनगेट ते चंपा मस्जिद रस्त्यास अब्दुल रब चाऊस हैराँ मार्ग हे नाव देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक: श्री.मुजीब आलम शाह खान, श्री.शहनवाज खान

अनुमोदक :श्री.मिर हिदायत अली, श्री.शेख अ.असद, डॉ.खान जफर अहेमद, श्रीमती जरीना मो.जावेद

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शिविल्याप्रमाणे रोशनगेट ते चंपा मस्जिद रस्त्यास प्रसिध्द कव्वाल आणि कवि श्री.अब्दुल रब चाऊस हैराँ मार्ग हे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.५४८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची मालमत्ता करापोटी मोठया प्रमाणात थकबाकी नागरीकांकडे आहे. मालमत्ताकराच्या आकारणी बाबत किंवा थकबाकीबाबत नागरिकांना आक्षेप आहे. काही इमारती पडक्या अवस्थेत असतांना देखील त्याचे मालमत्ता कर चालुच आहे. कित्येक मालमत्ताधारकांनी ठरावकि रक्कम भरून सुनावणी घेतली जावी अशी मागणी म.न.पा.कडे केली आहे. परंतु सुमारे दहा दहा वर्षापासुन त्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही.

सध्या औरंगाबाद मनपा आर्थिक अडचणीत आहे. प्रलंबीत प्रकरणामुळे किंवा चुकीच्या कर आकारणीमुळे मालमत्ताधारक कर भरण्यास धजावत नाही. करित मनपातर्फे आवाहन करून अशा मालमत्ताधारकांची सुनावणी घेण्यात यावी. One time settlement किंवा मालमत्ताधारकांमध्ये कर भरणा करण्यास प्रोत्साहन मिळावे अशा प्रकारची योजना आखण्यात यावी. जेणेकरून मनपाकडे थकबाकी भरण्यास नागरिक पुढे येतील. ज्यामध्ये मनपाचे हित देखील जोपासण्यात यावे आणि मालमत्ताधारकास दिलासा मिळावा.

करीता सर्वसाधारण सभेत विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक:श्री.मुजीब आलम शाह खान, अनुमोदक:श्री. मिर हिदायत अली,
डॉ.खान जफर अहेमद
श्री.शहनवाज खान
श्री.शेख अ.असद, श्रीमती जरीना मो.जावेद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता करापोटी मोठया प्रमाणात थकबाकी नागरीकांकडे असल्याने मनपातर्फे आवाहन करून अशा मालमत्ताधारकांची सुनावणी घेऊन One time settlement किंवा मालमत्ताधारकांमध्ये कर भरणा करण्यास प्रोत्साहन मिळावे अशा प्रकारची योजना आखण्यस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद डिस्ट्रीक पावरलिफ्टींग ॲण्ड वेटलिफ्टींग असोसिएशनच्या वतीने दिनांक २२/१२/२०११ ते २४/१२/२०११ दरम्यान ज्युनियर, सिनियर, मास्टरर्स राज्य पावरलिफ्टींग अजिंक्यपद स्पर्धा घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेतुन निवड झालेले खेळाडु राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करतील. करीता आयोजीत स्पर्धेसाठी महानगरपालिकेतर्फे रक्कम रु. ०१.०० लक्ष अर्थीक मदत करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर, अनुमोदक : श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग,
श्री.अनिल जैस्वाल,
श्री.अशोक बेहडे, सौ.ज्योती रुपचंद वाघमारे

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद डिस्ट्रीक पावरलिफ्टींग ॲण्ड वेटलिफ्टींग असोसिएशनच्या वतीने दिनांक २२/१२/२०११ ते २४/१२/२०११ दरम्यान ज्युनियर, सिनियर, मास्टरर्स राज्य पावरलिफ्टींग अजिंक्यपद स्पर्धेस औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रक्कम रु. ०१.०० लक्ष अर्थीक मदत नियमानुसार देणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,

१) स्वः बौध्दवासी भगवान राव शेजवळ यांचे नाव गल्ली क्र.७ मो. उत्तम नगर बौध्दनगर वार्ड क्र. ६७ ला नाव देणे.

२) स्वः बौध्दवासी महादेवराव सखाराम रायबान यांचे नांव गल्ली क्र.६ मो.उत्तम नगर बौध्दनगर वार्ड क्र.६७ ला नाव देणे. करीता ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अशोक किसनराव बेहडे अनुमोदक :सौ.ज्योती रुपचंद वाघमारे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ उत्तमनगर,बौध्दनगर भागात १) स्व: बौध्दवासी भगवानराव शेजवळ यांचे गल्ली क्र.७ व २) स्व: बौध्दवासी महादेवराव सखाराम रायबान यांचे गल्ली क्र.६ ला नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, या शहराजवळील श्रीक्षेत्र पैठण ही संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांची जन्मभुमी व कर्मभुमी आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायात श्री. क्षेत्र पैठणचे महत्व अनन्यसाधारण आहे. तसेच दरवर्षी नाथषष्ठीला मोठा काल्याचा उत्सव साजरा केला जातो. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील अनेक वारकरी तसेच शहरातील भाविक या शहरातून पैठणकडे जात असतात. करिता शहरातून श्रीक्षेत्र पैठणकडे जाणाऱ्या रस्त्यावर रेल्वे स्टेशन येथे असलेल्या उड्डाण पुलाला "श्री संत एकनाथ महाराज उड्डाण पूल" असे नाव देण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.संजय केनेकर, श्री.विकास जैन, श्री.गजानन बारवाल, श्री.प्रफुल्ल मालानी.

अनुमोदक :श्री.विजय वाघचौरे, श्री.संजय जोशी, श्री.मनिष दहिहंडे,श्री.नारायण कुचे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शिविल्याप्रमाणे शहरातून श्रीक्षेत्र पैठणकडे जाणाऱ्या रस्त्यावर रेल्वे स्टेशन येथे असलेल्या उड्डाण पुलाला "श्री संत एकनाथ महाराज उड्डाण पूल" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.५५२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर येथील गजानन महाराज मंदिर ते जयभवानी चौक हा सर्वात मोठा रहदारीचा रस्ता असून या रस्त्यावर हनुमान चौक येथे पाण्याच्या टाकीच्या आजुबाजूला बरेच अवैध धंदे चालत आहे. त्यामुळे त्या परिसरातील नागरीकांना त्याचा त्रास होतो. त्याला आळा बसावा व नागरीकांना सुरक्षा मिळावी त्यादृष्टीकोनातून त्याठिकाणी पोलीस चौकीची अत्यंत आवश्यकता आहे. मा.पोलीस आयुक्त यांनी सुध्दा अशा आवश्यक त्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिल्यास त्या ठिकाणी पोलीस चौकीची व्यवस्था करु असे पत्र दिलेले आहे.

वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर येथील हनुमान चौक येथे पाण्याच्या टाकीजवळ उपलब्ध असलेल्या मनपाच्या जागेवर पोलीस चौकी बांधण्यास परवानगी देण्यांत यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.सुर्यकांत जायभाये          अनुमोदक :श्री.त्र्यंबक तुपे, श्री.संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर येथील हनुमान चौक येथे पाण्याच्या टाकीजवळ उपलब्ध असलेल्या मनपाच्या जागेवर पोलीस चौकी बांधण्यास नियमाप्रमाणे परवानगी देण्यांस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर परिसर हा गुंठेवारी परिसर असून याठिकाणी सर्व गोरगरीब नागरीक राहतात. याभागातील लोकसंख्या आजमितीस ५० हजाराच्या पेक्षा जास्त आहे. तसेच या भागात आवश्यक त्या मुलभुत सुविधा उदा. ड्रेनेज,

खुल्या गटारी, नाली, रस्ते इत्यादी पूर्णपणे उपलब्ध नसल्यामुळे, पावसाळयामध्ये पाण्याचा निचरा योग्यप्रकारे होत नाही. परिणामी या भागात साथीचे आजार उद्‌भवतात. त्याला आळा घालण्यासाठी याठिकाणी नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वसोयीयुक्त आरोग्य केंद्र असणे आवश्यक आहे.

वॉर्ड क्र.८३ अंतर्गत हनुमान चौकाजवळ महापालिकेची जागा उपलब्ध असून त्याठिकाणी बांधकाम करुन एक सुसज्ज आरोग्य केंद्र सुरु करण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.सुर्यकांत जायभाये

अनुमोदक : श्री.किशोर नागरे, श्री.आगा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर परिसर हनुमान चौकाजवळ महापालिकेची जागा उपलब्ध असून त्याठिकाणी नियमाप्रमाणे एक सुसज्ज आरोग्य केंद्र सुरु करण्यांस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५५४:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रं.२२ नारेगांव येथील विकास कामासाठी सन २०११-१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १ | लेखाशिर्षक व्यापारी संकुले व इतर इमारती वार्ड क्र.२२ अंतर्गत व्यायाम शाळा बांधणेसाठी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पात वार्ड ब नविन कामे १६ अ.क्र.१ वर ५ लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.२२ नारेगांव येथे विविध ठिकाणी कॉंक्रेट रस्ता करणे. ५ लक्ष |

सुचक :श्री.मनिष चंद्रकांत दहिहंडे

अनुमोदक :श्री.हुशारसिंग चव्हाण, श्री.विरभद्र गादगे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्रं.२२ नारेगांव येथील विकास कामासाठी सन २०११-१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन कामाच्या लेखाशिर्षकामध्ये बदल करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक व्यापारी संकुले व इतर इमारती वार्ड क्र.२२ अंतर्गत व्यायाम शाळा बांधणेसाठी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पात वार्ड ब नविन कामे १६ अ.क्र.१ वर ५ लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.२२ नारेगांव येथे विविध ठिकाणी कॉंक्रेट रस्ता करणे. ५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५५५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७६ हनुमान मंदीर जवळील जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुठ पुतळा उभारणे बाबत स्थानिक नागरीकांची बऱ्याच दिवसांपासुन मागणी आहे.

सदरील परीसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे, परीसराचे सौंदर्यकरणे, कामासाठी आर्थिक तरतुद आर्थिक वर्षात उपलब्ध करणे आवश्यक असल्याने याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सविता घडमोडे, सौ.कौशल्या गांगवे,

अनुमोदक : श्री.नारायण कुचे, श्रीमती कमलताई नरोटे, श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर,
श्री.संजय चौधरी, श्री.महेश माळवतकर, श्री.बबन नरवडे

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७६ हनुमान मंदीर जवळील जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुठ पुतळा उभारणेस व परीसराचे सौंदर्यकरणेस मंजूरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी .

**<u>विषय क्र.:५५६</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेने विद्युत विभागाचे वाहन चालक श्री.अंबादास अन्ना गायकवाड यांना ह्दयविकाराच्या आजारासाठी वैद्यकीय अग्रिम मिळण्यासाठी त्यांनी त्यांच्या हयातीत अर्ज सादर केला होता. परंतु त्यांना वैद्यकीय अग्रिम मिळाले नाही. दिनांक १९.११.२०११ रोजी हैड्रॉलिक वाहनावर काम करीत असतांना त्यांना ह्दयविकाराच्या कारणास्तव साई हॉस्पीटल, समर्थनगर येथे दुपारी दाखल करण्यात आले होते. दिनांक २०.११.२०११ रोजी पहाटे सुमारे २ वाजता त्यांची प्रकृती खालावली असल्याने तेथील डॉक्टरांनी एमजीएम सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल येथे इंन्जोप्लास्टीसाठी दाखल केले व सकाळी इंन्जोप्लास्टी झाली. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतिमध्ये सुधारणा झाल्याने दिनांक २९.११.२०११ रोजी डिस्चार्ज करण्यात आले. या उपचारादरम्यान महानगरपालिकेकडुन वैद्यकीय अग्रिम न मिळाल्यामुळे त्यांनी नातेवाईक, मित्र परिवार यांचेकडून हात उसने कर्ज घेऊन साई हॉस्पीटलचे रूपये ३०७५०/- व एमजीएम हॉस्पीटलचे रूपये २,५४४३७/- असे एकुण २,८५,१८७.००/- अदा केले. वैद्यकीय अग्रिमची संचिका अद्यापही प्रलंबित आहे. दिनांक ०७.१२.२०१२ रोजी सकाळी सुमारे पहाटे ५ वाजता त्यांचे ह्दयविकाराच्या तिव्र झटक्याने दुःखद निधन झाले तरी त्यांच्या हयातीत महानगरपालिकेच्या सेवेत असतांना वैद्यकीय उपचारापोटी ह्दयविकाराची शस्त्रक्रिया (इंन्जोप्लास्टी) व तत्सम आजारासाठी त्यांची पत्नी श्रीमती मिना अंबादास गायकवाड यांना विशेष बाब म्हणुन वरिल प्रमाणे वैद्यकीय खर्च देण्यासाठी मान्यतेस्तव सादर.

सूचक :श्री.संजय केनेकर, श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण

अनुमोदक: श्री.विजय वाघचौरे, श्री.बबन नरवडे, श्री.मिर हिदायत अली, श्री.किशोर नागरे,
श्री.कृष्णा बनकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत विभागाचे वाहन चालक श्री.अंबादास अन्ना गायकवाड यांना ह्दयविकाराच्या आजारासाठी झालेला वैद्यकीय खर्च एकुण रक्कम रुपये २,८५,१८७.००/- इतकी रक्कम त्यांची पत्नी श्रीमती मिना अंबादास गायकवाड यांना विशेष बाब म्हणुन नियमाप्रमाणे देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५७:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणा येथील आठवडी बाजार विकास कामासाठी अर्थसंकल्पात पा.क्र. ईई -अे बी एस - ई २ अ.क्र.२० वर र.रु.१०.०० लक्ष तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. तथापी सद्यस्थितीत हे काम करणे आवश्यक नसल्यामूळे त्याऐवजी वॉर्ड क्र.२३ अंतर्गत चिकलठाणा येथे जलवाहिनी टाकणेसाठी सदर र.रु.१०.०० लक्ष वळती करणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजय चौधरी, अनुमोदक :श्री.खाजा शरफोद्दीन

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणा येथील आठवडी बाजार विकास कामासाठी अर्थसंकल्पात पा.क्र. ईई -अे बी एस - ई २ अ.क्र.२० वर र.रु.१०.०० लक्षची तरतूद ऐवजी वॉर्ड क्र.२३ अंतर्गत चिकलठाणा येथे जलवाहिनी टाकणेसाठी सदर र.रु.१०.०० लक्ष वळती करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:५५८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सिध्दार्ध उद्यान हे प्रसिध्द व एकमेव सुस्थितीत असलेले उद्यान आहे. या उद्यानाचे देखभालीकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. परंतु बऱ्याच वर्षापासून या उद्यानाकडे दुर्लक्ष झाले असल्याचे दिसून येते. मध्यवर्ती बसस्थानकाच्या जवळ हे उद्यान असल्याने उद्यानास भेट देणाऱ्यांमध्ये शहरातील नागरीकांसोबतच बाहेरील प्रवासी जनतेचा मोठया प्रमाणात समावेश आहे. या उद्यानात भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यात आली असल्याने त्यास आणखी महत्व प्राप्त झालेले आहे.

यापुढे सिध्दार्थ उद्यानाची उत्तम प्रकारे देखभाल करण्यात यावी. यासाठी सिध्दार्थ उद्यानाचे प्रवेश-फी मधून मिळणारे उत्पन्न स्वतंत्र लेखाशिर्षाखाली ठेवण्यात यावे. या माध्यमातून जमा झालेल्या रक्कमेतून उद्यानाचे देखभाल, सुधारणेची कामे प्राधान्यक्रमाने व विशेष काळजीपुर्वक हाती घेण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.राजू रामराव शिंदे, अनुमोदक: श्री.अमित भुईगळ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्ध उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी सिध्दार्थ उद्यानाचे प्रवेश-फी मधून मिळणारे उत्पन्न स्वतंत्र लेखाशिर्षाखाली ठेवण्यात येवून जमा झालेल्या रक्कमेतून उद्यानाचे देखभाल, सुधारणेची कामे करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:५५९**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद अम्यचुअल त्वाईक्वांदो असोशिएशन तर्फे विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहे. औरंगाबाद शहरातील विभागीय स्तरावर क्रीडा प्रेमींना त्या मध्ये सहभाग घेता यावा व प्रोत्साहन मिळावे या साठी सदरील आयोजीत स्पर्धेकरीता औरंगाबाद महानगरपालिका तर्फे आर्थिक मदत म्हणुन किमान रक्कम रु. ०१.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. तरी मा. महोदया येत्या सर्व साधारण सभे समोर उक्त स्पर्धे करीता आर्थिक मदत रक्कम रु.०१.०० लक्ष चा निधी उपलब्ध करुन देणे बाबत चा प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. संजय केनेकर, श्री.त्र्यंबक तुपे,श्री.प्रमोद राठोड

अनुमोदक :श्री.मीर हिदायत अली ,श्री.अफसर खान

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद अम्यचुअल त्वाईक्वांदो असोशिएशन तर्फे विभागीय स्तरावर आयोजीत स्पर्धेसाठी महानगरपालिका तर्फे आर्थिक मदत रक्कम रु.०१.०० लक्ष निधी नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते वैधनिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.:५६०</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मागासवर्गीयांसाठी ब-याच वर्षाचा अनुशेष भरण्यासाठी शासन दरबारचे पत्र मनपाला मिळाले आहे. सदरील पत्र हे फक्त अनुशेष भरण्याबाबत आहे. त्यामुळे मनपा मध्ये अनुशेष भरतांना मनपाच्या स्थितीचे अवलोकन झाले पाहिजे एकीकडे २० वर्षापासुन दैनिक वेतनावर कर्मचारी काम करीत आहेत व मनपा त्यांना वेतन अदा करते आहे. सदरील कर्मचारी व कामगार हे अनुशेष भरतीसाठी पुरक आहे. तसेच मनपाच्या त्यांना घेण्यामुळे बराच प्रमाणावर मनपावरील आर्थिक बोजा कमी होईल.

दैनिक वेतनावरील कामगारांना सुध्दा प्राधान्य मिळेल यासाठी हा अनुशेष भरण्यापुर्वी परत एकदा पत्र व्यवहार करुन आपण महानगरपालिकेची आजची भयावह परिस्थिती समजावुन सांगुन अनुशेष आपण दैनिक वेतन कामगार व कर्मचा-यां मधुन भरण्याच्या परवानगीचा प्रस्ताव शासनाला पाठवावा.व या प्रकरणी शासनाच्या मार्गदर्शनानुसार पुढचा विचार करावा. सदरील असा आशयाचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यास संदर्भात ठरावास मान्यता द्यावी.

सुचक :श्री.संजय केनेकर, श्री.त्र्यंबकजी तुपे, श्री.प्रमोदजी राठोड

अनुमोदक :श्री.मीर हिदायत अली, श्री.अफसर खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी शासनाकडुन मिळालेल्या पत्रानुसार अनुशेष भरण्यापुर्वी महापालिकेतील दैनिक वेतन कर्मचारी यांच्यामधुन भरण्यासाठी शासनाकडुन परवानगी घेण्यासाठी प्रस्ताव शासनांस पाठविण्यास व शासन मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं.५६१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९९ शिवाजी नगर ११ वी योजना मधील डी सेक्टर येथील खुली जागा श्री.साईबाबा संस्थान यांनी त्या ठिकाणी आध्यात्मीक विकास कार्यक्रम तसेच बालसंस्कार केंद्र चालविण्यासाठी त्या संस्थेस मनपाच्या नियमानुसार भाडेतत्वावर देण्यात यावी असा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

सुचक: छायाताई साईनाथ वेताळ, अनुमोदक : श्री.सुशिल खेडकर, श्री.सुरेंद्र मा.कुलकर्णी

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शिविल्याप्रमाणे वार्ड क्र.९९ शिवाजी नगर ११ वी योजना मधील डी सेक्टर येथील खुली जागा श्री.साईबाबा संस्थान त्यांना आध्यात्मीक विकास कार्यक्रम तसेच बालसंस्कार केंद्र चालविण्यासाठी मनपाच्या नियमानुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी .

**<u>विषय क्रं.५६२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बारी कॉलनी येथील रहिवाशी आणि बारी कॉलनीचे संस्थापक श्री. अब्दुल बारी कुरैशी हे प्रतिष्ठीत नागरीक होते. कित्येक सामाजिक संघटनांशी त्यांचा संबंध होता. या भागातील सामाजिक, धार्मिक कार्यात ते सदैव अग्रेसर राहत. त्यांच्या कुटूंबियांनी देखील त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ हॉस्टेल आणि शाळा स्थापन केलेली आहे. या भागातील नागरिकांमध्ये त्यांच्या विषयी आदर होता. अशा सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि प्रतिष्ठीत नागरिकांचे नांव मदनी चौक ते मध्यवर्ती जकातनाका रस्त्यास दिल्यास या भागातील नागरिकांना आनंद होईल.

करीता मदनी चौक ते मध्यवर्ती जकात नाका रस्त्यास श्री.अब्दुल बारी कुरैशी मार्ग ठेवण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येत आहे.

सुचक:श्री.शेख अ.असद अ.रशीद    अनुमोदक:डॉ.जफर अहमद खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मदनी चौक ते मध्यवर्ती जकात नाका या रस्त्यास श्री.अब्दुल बारी कुरैशी मार्ग असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं.५६३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५३ मधील जसवंतपुरा (मनपा प्रा.शाळा न.१ समोरील) येथे मंजुर रेखांकनाची खुली जागा आहे. या खुल्या जागेवर चारही बाजुने संरक्षक भिंत तयार करण्यात आली होती. परंतु सध्या संरक्षक भिंत पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे. तसेच या खुल्याजागेवर ठिकठिकाणी खड्डे निर्माण झाले आहे. करीता या खुल्या जागेची संरक्षक भिंत आणि खुल्या जागेचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे या भागातील खेळाडुंना आणि नागरिकाना लाभ होईल. करिता मंजूर रेखांकनातील सदरील खुल्या जागेचे सर्वेक्षण करून खुली जागा विकसीत करण्यासाठी अंदाजे ३०.०० लक्ष रूपयांची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक:श्री.शेख अ.असद    अनुमोदक:डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५३ मधील जसवंतपुरा (मनपा प्रा.शाळा न.१ समोरील) येथे मंजुर रेखांकनाच्या खुल्या जागेचे सर्वेक्षण करून तेथे संरक्षक भिंत आणि खुल्या जागेचा विकास करण्यासाठी ३०.०० लक्ष रूपयांची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं.५६४:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौलाना अब्दुल गफुर नदवी हे अन्वार उल उलुम हया शाळेचे संस्थापक होते- कित्येक विद्यार्थ्यांना त्यांनी अरबी आणि उर्दुचे शिक्षण देउन प्रशिक्षीत केले. सामाजिक आणि धार्मिक चळवळीमध्ये ते अग्रेसर होते. तसेच सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले. अशा गुरूवर्यास बायजीपुरा येथील कुरैशी कॉर्नर (गंजे शहीद मस्जीद) येथील चौकाचे नाम देउन आदरांजली वाहणे आवश्यक आहे.

करीता बायजीपुरा येथील कुरैशी कॉर्नर चौकास मौलाना अब्दुल गफुर नदवी चौक हे नाव देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक:डॉ.जफर अहमद खान    अनुमोदक:श्री.शेख असद शे.अ.रशीद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथील कुरैशी कॉर्नर चौकास मौलाना अब्दुल गफुर नदवी चौक असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं.५६५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील बहुतांश नागरीकांना बहुमजली इमारतीचे अथवा तत्सम बांधकाम परवानगी/भोगवटा प्रमाणपत्र घेतांना चिकलठाणा विमानतळ प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महानगरपालिके मार्फत करण्यात येते.त्यामुळे शहरातील नागरीकांना नाहक अडचण निर्माण होत असुन पर्यायाने महानगरपालिकेच्या महसुलात तसेच शहर विकासास अडचणी निर्माण होत आहे.

यासाठी नागरी विमानन मंत्रालय नवि दिल्ली यांचे दिनांक १४ जानेवारी २०१० रोजी प्रसिध्द झालेले भारत राजपत्र (the gazette of india) मधिल नियमानुसार शहरातील नागरीकांना/संस्थांना बहुमजली इमारत बांधकाम परवानगी बाबतचे (शहरातील कोणत्या भागामध्ये किती उंचीचे बांधकाम अनुज्ञेय आहे) जाहीर प्रगटन महानगरपालिके मार्फत प्रसिध्द करणे आवश्यक आहे. चिकलठाणा विमानतळाची मुख्यधावपट्टीची लांबी ही १८०० मीटर पेक्षा अधिक असुन मुख्य धावपट्टी ही १५० मीटर रूंदीची आहे.

इंटरनॅशनल सिव्हील ॲनिवेशन ऑर्गनायझेशन (ICAO) मधिल ॲनेक्स १४ तसेच भारत राजपत्र (the gazette of india) मधिल नियमानुसार/मार्गदर्शक तत्वानुसार खालील नुसारचे उंचीचे बांधकाम अनुज्ञेय आहे.

- मुख्य धावपट्टीच्या दोन्ही बाजुने ६० मीटर नंतर प्रत्येक १०० मीटर लांबीला २ मीटर प्रमाणे
  २२५० मीटर पर्यत उंचीचे बांधकाम
- मुख्य धावपट्टीच्या सेंटर लाईन पासुन दोन्ही बाजुने ४६५ मीटर पासुन ४००० मीटर पर्यंत ४५ मीटर उंचीचे (विमानतळाच्या समुद्र सपाटीपासुनच्या उंची सह) बांधकाम
- मुख्य धावपट्टी पासुन अप्रोच सर फेस मध्ये २२५० मीटर नंतर ४५ मीटर उंचीचे (विमानतळाच्या समुद्र सपाटीपासुनच्या उंची सह) बांधकाम.
- मुख्य धावपट्टीच्या सेंटर लाईन पासुन दोन्ही बाजुने ४००० मीटर पासुन ६१०० मीटर पर्यंत अतिरिक्त ५ मीटर उंचीचे बांधकाम.

नागरी विमानन मंत्रालय, नवि दिल्ली यांचे दिनांक १४ जानेवारी २०१० रोजी प्रसिध्द झालेले भारत राजपत्र (the gazette of india) मधिल नियमानुसार तसेच इंटरनॅशनल सिव्हील ॲनिवेशन ऑर्गनायझेशन (ICAO) मधिल ॲनेक्स १४ मधिल मार्गदर्शक तत्वानुसार विमानतळाच्या मुख्य धावनपट्टीपासून outer Horizontal surface, conical surface, inner horizontal surface, approach surface, transitional surface व Take off climb surface नुसारशहरामधील कोणकोणत्या भागामध्ये किती उंचीचे बांधकाम अनुज्ञेय आहे. याबाबत सविस्तर माहिती दिलेली असल्याने या उंचीपर्यंतच्या शहरातील कोणत्याही बांधकामासाठी विमानतळ प्राधिकरण यांचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मागविण्यात येवु नये तसेच शहरातील नागरीकांसाठी जाहीर प्रगटनाद्वारे शहरातील कोणकोणत्या भागामध्ये किती उंचीचे बांधकाम अनुज्ञेय आहे. याबाबत माहिती देणे तसेच ज्या भागामध्ये जास्त उंचीचे बांधकाम असल्यास ते पाडणे तसेच भारत राजपत्र (the gazette of india) मधिल

नियमानुसार तसेच इंटरनॅशनल सिव्हिल ॲनिवेशन ऑर्गनायझेशन (ICAO) मधिल ॲनेक्स १४ मधिल मार्गदर्शक तत्वापेक्षाही जास्त उंचीचे बांधकाम परवानगीसाठी महानगरपालिकेकडे रितसर अर्ज असल्यास सदरचा अर्ज विमानतळ प्राधिकरण यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

वरील नुसार जाहीर प्रगटन प्रसिध्द केल्याने शहरातील नागरीक / संस्था हे महानगरपालिकेत रितसर / नियमानुसार बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र सादर करतील त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात तसेच शहराच्या विकासात भर पडणार आहे.

करीता वरीलनुसारची कार्यवाही प्रस्तावित करणे, शहरातील नागरीकांना बहुमजली इमारतीचे अथवा तत्सम बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र घेतांना चिकलठाणा विमानतळ प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महानगरपालिके मार्फत वरील नुसारच्या तत्वानुसार न करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक: सौ.सविता भगवान घडमोडे, अनुमोदक:श्री.बबन नरवडे, सौ.कौशल्या गांगवे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंटरनॅशनल सिव्हील ॲनिवेशन ऑर्गनायझेशन (ICAO) मधिल ॲनेक्स १४ तसेच भारत राजपत्र (the gazette of india) मधिल प्रस्तावात नमुद नियमानुसार/मार्गदर्शक तत्वानुसार व प्रस्तावात नमुद केलेल्या उंचीच्या बांधकामास, शहरातील नागरीकांना बहुमजली इमारतीचे अथवा तत्सम बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र घेतांना चिकलठाणा विमानतळ प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महानगरपालिके मार्फत वरील नुसारच्या तत्वानुसार न करणे बाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.५६६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र ४८ अविष्कार कॉलनी येथे क्रीडा संकुल उभारणे करीता सा.बां. विभागाचे सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. ३५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र ३१९ दिनांक १८.५.२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव पाचव्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९% जास्त दराची एकच निविदा दर भरुन प्राप्त झालेली आहे. तथापि दराबाबतच्या वाटाघाटी अंती १९.९% जास्त दरा ऐवजी १७.९०% जास्त दराने कंत्राटदार स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी दराने काम करण्यास तयार आहेत सदर कामासाठी महापौर आपत्कालीन निधी या लेखाशिर्षकांतर्गत रु. २५.०० लक्ष एवढा निधी मा.महापौर यांनी त्यांचे पत्र जा.क्र/७०३/११ दिनांक २.२.२०११ अन्वये दिला आहे. सदर निधीची नोंद वर्ष २०११-१२ च्या अर्थसंकल्पात घेणेच्या अटीवर उपरोक्त निविदेस म्हणजेच स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९०% जास्त दराने निविदा दरास मंजुरी मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र ४८ अविष्कार कॉलनी येथे क्रीडा संकुल उभारणेचे कामासाठी स्टार कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९०% जास्त दराचे निविदेस मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५६७</u> :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड ९८ अंतर्गत साई वृदांवन कॉलनी येथील जुनी ए.सी जलवाहीनी काढून नविन १०० व १५० मि.मि. व्यासाची डी.आय. के-७ जलवाहीनी टाकणे या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००९-१० च्या दरसुची नुसार रक्कम रू. ५,६९,६४५/- एवढयाचे तयार करण्यात आले होते सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची दिनांक ०२-०८-२०११ नुसार मान्यता प्रदान केली होती त्या अनुशंगाने ई निविदा विभागाकडून निविदा मागविण्यात आल्या असता मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३६टक्के जास्त दराची प्राप्त झाली होती या निविदेस मा.आयुक्त यांनी दिनांक ३-१०-२०११ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे सदर मंजुरी अंतर्गत नविन १०० व १५० डी आय के जलवाहीनी ही साईवृंदावन कॉलनी येथील दुषित पाणी पुरवठा बंद करण्यासाठी टाकण्यात येत आहे रेल्वेस्टेशन ओव्हर ब्रिज पासुन साईवृदावन कॉलनी पर्यत १०० व १५० मि.मी व्यासाची डी.आय के -७ जलवाहीनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे निविदेनुसार कामास सुरूवात झालेली असुन आतापर्यंत कामावर रू. ७,७६,७६८/- इतका खर्च झालेला आहे काम पुर्ण झालेले आहे तथापी दुषित पाणी पुरवठयाचा प्रश्न सुटलेला नाही दुषित पाण्याचे समुळ उच्याटन करण्याकरीता रेल्वे ओव्हरब्रिज पासुन संपूर्ण लाईन बदलल्यास दुषित पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपेल या कारणामुळे सदरील कामाची लांबी वाढल्याने अंदाजपत्रक सुधारित करावे लागले आहे.

जलवाहीनीची लांबी सुमारे ७०० मी इतकी वाढलेली आहे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक म.जि.प्रा. मंडळाच्या सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार तयार केले असुन अंदाजपत्रक रक्कम (वाढीव लांबीकरीता)रूपये १६,६४,५६५/- इतकी आहे म्हणजेच मुळ अंदाजपत्रक वाढीव लांबीकरीताचे अंदाजपत्रकाची एकुण किंमत रू. २२,३४,२१०/- इतकी येते प्राप्त निविदा दर हे ३६.३६टक्के जास्त दराचे आहे प्राप्त निविदा दरानुसार एकुण किंमत रूपये ३०,४६,५६९/- इतकी येते.

दुषित पाणी पुरवठा निर्मुलनाचे प्राधान्य लक्षात घेता मा.महापौर यांनी या कामाकरीता मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामासाठी तरतुद या लेखाशिर्षकातुन रूपये ३०,००,०००/-निधी उपलब्ध करून दिलेला आहे तरी सुधारीत अंदाजपत्रक रू. २२,३४,२१०/- चे मान्यतेस्तव सादर तसेच प्राप्त निविदाधारक मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून ३६.३६ टक्के जास्त या दराने करून घेण्यासह एकुण रूपये ३०,४६,५६९/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ व मान्यतेस्तव सादर

**<u>ठराव</u> :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड ९८ अंतर्गत साई वृदांवन कॉलनी येथील जुनी ए.सी जलवाहीनी काढून नविन १०० व १५० मि.मि. व्यासाची डी.आय. के-७ जलवाहीनी टाकणे या कामाचे रू. २२,३४,२१०/- चे सुधारीत अंदाजपत्रकास व प्राप्त निविदाधारक मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून ३६.३६ टक्के जास्त या दराने करून घेण्यासह एकुण रूपये ३०,४६,५६९/- च्या खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५६८:</u>**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, १३ वा वित्त आयोग अंतर्गत सन २०११-१२ या वित्तीय वर्षा करीता प्रथम हप्ता रूपये ४.८८ कोटी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. प्राप्त झालेल्या निधीतुन शहरातील घनकचरा व्यवस्थापन

व इतर कामासाठी खालील प्रमाणे विविध प्रकारच्या यंत्रसामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.रामके एन्व्हायरो इंजि.लि. हैद्राबाद या संस्थे मार्फत करून घेण्यात येत आहे. तथापी करारानुसार डेब्रिज व ग्रीन वेस्ट संकलन-वाहतुकीचे कामासाठी मे.रामके यांना अतिरिक्त रक्कम द्यावी लागत असल्यामुळे हे काम महानगरपालिकेच्या यंत्रणेद्वारे करून घेण्यात येत आहे.

सद्यस्थितीत डेब्रिज व ग्रिनवेस्ट वाहतुकीसाठी आवश्यकतेनुसार मनपाचे जुने टिप्पर्स वापरण्यात येत असुन, या कामात सुसूत्रता आणण्यासाठी व घनकचरा व्यवस्थापन नियम २००० पालन करण्यासाठी प्रत्येक प्रभागास एक या प्रमाणे सहा नग हुकलोडर मशिन्स प्रत्येकी चार नग हुकलोडर बिन्स (क्षमता ९ टन) प्रमाणे एकुण २४ हुकलोडर बिन्स सह खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच सध्या अरूंद रस्त्यावरील डेब्रिज व ग्रीनवेस्ट संकलनासाठी यंत्रणा नाही. सदरील काम जलदगतीने होण्यासाठी प्रत्येक प्रभागासाठी ४ व १ राखीव असे एकुण २५ नग ॲटोटिप्पर्स खरेदी करणे आवश्यक आहे..

या शिवाय मनपाकडे सद्यस्थितीत असलेले ४ जेसीबी मशिन्स अपुरे पडत असल्यामुळे जेसीबी जेसीबी प्रमाणेच लेव्हलींग व लोडींगची कामे करू शकणारे परंतु किमतीने जेसीबी मशिन पेक्षा कमी असलेले ट्रॅक्टर (लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसह) खरेदी करणे गरजेचे आहे.

तसेच हॅन्कार्टस हा घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदेतील वन टाईम सप्लाय ॲटम असल्यामुळे व अतिरिक्त लागणाऱ्या हॅन्डकार्टस मनपाने स्वखर्चाने खरेदी करावयाच्या असल्याने, संपूर्ण शहरातील डोअरस्टेप कलेक्शनसाठी ५०० नग हॅन्डकार्टसची आवश्यकता आहे. प्रत्येकी १०० लिटर क्षमतेच्या २ बिन्ससह हॅन्डकार्टस (५०० नग) खरेदी केल्यास घरोघरी कचरा संकलन करणे व हॅन्डकार्टसद्वारे जमा केलेला घनकचरा ट्रान्सफर पॉईट बिन्स अथवा कचरा वाहतुकीच्या वाहनामध्ये सरळ अनलोड करणे शक्य होणार आहे.

उरोक्त मशिनरी खरेदीसाठी उत्पादक कंपण्यांच्या दरपत्रकांचा आधार घेऊन अंदाजपत्रक बनविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मशिनरी | अंदाजपत्रकीय दर | नग | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | हुकलोडर मशिन | १९,८२,३३१/- | ०६ | १,१८,९३,९८६/- |
| २ | हुकलोडर बिन्स (क्षमता ९ टन) | ५,००,०००/- | २४ | १,२०,०००,००/- |
| ३ | ॲपे एक्स्ट्रा चेसीस | १,५५,४००/- | २५ | ३८,८५,०००/- |
| ४ | ॲटोटिप्पर हॉपर्स | १,९३,३००/- | २५ | ४८,३२,५००/- |
| ५ | ट्रॅक्टर (लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसह) | १२,००,०००/- | ०१ | १२,००,०००/- |
| ६ | हॅन्डकार्टस (प्रत्येकी दोन नग १०० लिटर क्षमतेच्या बिन्ससह) | ९,९००/- | ५०० | ४९,५०,०००/- |
| ७ | टाटा एस.के.-१६१३/३६ चेसीस | ११,८१,७४५/- | ०६ | ७०,९०,४७०/- |
| | | | एकुण | **४,५८,५१,९५६/-** |

हुकलोडर मशिन्स उभारणीसाठी लागणाऱ्या सहा नग टाटा-एसके-१६१३/३६ चेसीस शासकीय दराने खरेदी करण्यात येतील. सद्यस्थितीतील टाटा कंपनीच्या शासकीय दरानुसार प्रत्येकी रूपये ११,८१,७४५/- प्रमाणे एकुण रूपये ७०,९०,४७०/- खर्च येणार आहे. हे दर

सध्याचे असुन या दरात बदल होवु शकतो. प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी जी किंमत असेल त्या प्रमाणे देयक अदाई करावे लागेल. तसेच इंशुरन्स व आरटीओ पासींगचा खर्च वेगळा करावा लागेल.

उपरोक्त अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली व सदरील खर्च १३ वा वित्त आयोग लेखाशिर्षातुन करण्यास मंजुरी मिळाली तर मशिनरी खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यात येतील व टाटा कंपनीच्या चेसीस शासकीय दराने खरेदी करण्यात येतील.

करीता घनकचरा व्यवस्थापनासाठी यंत्रसामुग्री खरेदी करीता रूपये ४,५८,५१,९५६/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव तसेच सदरील खर्च १३ वा वित्त आयोग लेखाशिर्षातुन करण्याच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव**:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनासाठी यंत्रसामुग्री खरेदी करीता प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रूपये ४,५८,५१,९५६/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच सदरील खर्च १३ वा वित्त आयोग लेखाशिर्षातुन करणेस मंजूरी देण्यात येते तसेच शहरातील कचरा उचलणेसाठी आवश्यक यंत्रसामूग्री खरेदी करावयाची असल्यास त्यासंबंधी संबधीत विभागाने योग्य ती कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जालना रोडवरील आकाशवाणी ते सेव्हन हिल या रस्त्याच्या दक्षिणेकडील विविध उद्यानातील पाण्याची व्यवस्था करणे व रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे व उद्यानाची देखभाल व संगोपन करणे या कामाकरीता मा.आयुक्त महोदय यांनी रक्कम रुपये ६०,९७,२००/- चे अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. या कामांतर्गत

अ. वार्ड क्रं.५० मधील खुल्या जागा विकसीत करणे व त्या ठिकाणी झाडे लावणे, लॉन लावणे, उद्यान विषयक कामे करणे.

ब. रस्त्याच्या दुतर्फा व उद्यानात एकंदरीत १३०० झाडे लावणे व त्यापैकी अंदाजे ७०० झाडांना लोखंडी जाळया लावणे.

क. वरील काम होण्यासाठी बसैय्येनगर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये असलेल्या विहीरीतील गाळ काढणे व त्यावर विद्युत मोटार (पाच अश्व शक्तीची) बसविणे.

ङ विहीरी पासुन १० खुल्या जागांना पाणी पुरवठा पाईपद्वारे करणे.

वरील अ, ब व क चे कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३०,९७,०००/- आहे. १० खुल्या जागांना पाणी पुरवठा विहीरीपासुन पाईप लाईनद्वारे करणे हे काम रक्कम रुपये ३०.०० लक्षचे आहे.

सबब उपरोक्त कामासाठी एकत्रीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६०,९७,२००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर. सदरील कामाचा खर्च हा हरीत औरंगाबाद या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१०-११ मधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवरील आकाशवाणी ते सेव्हन हिल या रस्त्याच्या दक्षिणेकडील विविध उद्यानातील प्रस्तावात नमुद अ ते ड मधील कामासाठी एकत्रीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६०,९७,२००/- स मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं.:-५७०**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,दि.७/६/२०११ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-२ व वर्ग-३ संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुढील मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि सदरील बैठक तहकूब झाल्यामुळे याबाबत निर्णय झाला नसल्याने, मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर निर्णयाच्या अधिन राहून खालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.१०/५/२०११ ते दि.९/११/२०११ पर्यंत सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात आली. सदरील प्रस्ताव दि.१९/०७/२०११ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत सदरील मुदतवाढीस विषय क्र.३९१ अन्वये कार्योत्तर मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-२ व ३ संवर्गात खालील अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ.किरण कावळे | वै.अधि.ठ.वेतन | आरोग्य विभाग | रु.१२०००/- प्रतिमाह |
| २. | डॉ.संतोष कस्तुरे | विकृतीशास्त्र अर्धवेळ | आरोग्य विभाग | रु.५०००/- प्रतिमाह |
| ३. | गजानन आढाव | स्व.निरीक्षक | आरोग्य विभाग | रु.३६५/- |
| ४. | नंदन संजय महादू | पशुधन पर्यवेक्षक | प्राणी संग्राहलय विभाग | रु.३६५/- |
| ५. | राहूल नटवरलाल पटेल | मिश्रक | आरोग्य विभाग | रु.३६५/- |
| ६. | शे.महेबूब हुसेन | कनिष्ठ लिपीक | उपआयुक्त (सिडको) यांचे दालन | रु.३६५/- |
| ७. | रावसाहेब जावळे | कनिष्ठ लिपीक | प्राणी संग्रहालय | रु.३६५/- |
| ८. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | रु.३६५/- |
| ९. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | रु.३६५/- |
| १०. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | रु.३६५/- |
| ११. | देवीदास यु. कुंटे | कनिष्ठ लिपीक | पापु व जलनि:सारण (अ/-ड) | रु.३६५/- |
| १२. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा विभाग (ई/फ) | रु.३६५/- |
| १३. | मिलिंद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | रस्ते,इमारती,उद्यान (वॉर्ड-अ) | रु.३६५/- |
| १४. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | शहर अभियंता विभाग | रु.३६५/- |
| १५. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | रु.३६५/- |
| १६. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | विद्युत(इ/फ)विभाग | रु.३६५/- |
| १७. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांध.विभाग | रु.३६५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांध.विभाग | रु.३६५/- |
| १९. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | जलतरण विभाग | रु.३६५/- |
| २०. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | वाचनालय विभाग | रु.३६५/- |
| २१. | शफिक अहेमद | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | रु.३६५/- |
| २२. | अरूण गुजलेकर | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | रु.३६५/- |
| २३. | सय्यदा अफजलुन्नीसा नहेरी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | रु.३६५/- |
| २४. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ब कार्यालय | रु.३६५/- |
| २५. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ड कार्यालय | रु.३६५/- |
| २६. | सुभाष नाईक | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ड कार्यालय | रु.३६५/- |
| २७. | अखिल उर्र रहेमान | कनिष्ठ लिपीक | वार्ड-इ कार्यालय | रु.३६५/- |
| २८. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वार्ड-फ कार्यालय | रु.३६५/- |
| २९. | अमोल जेवरीकर | कनिष्ठ लिपीक | निवडणूक विभाग | रु.३६५/- |
| ३०. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | बांधकाम-१ कार्यालय | रु.३६५/- |
| ३१. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | बांधकाम-१ कार्यालय | रु.३६५/- |
| ३२. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | सुजयो,प्रकल्प विभाग | रु.३६५/- |
| ३३. | अफसर सिध्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.३६५/- |
| ३४. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.३६५/- |
| ३५. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.३६५/- |
| ३६. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.३६५/- |
| ३७. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | कर निर्धारक व संकलक विभाग | रु.३६५/- |
| ३८. | मो.मुसा मो.याकूब कुरैशी | कनिष्ठ लिपीक | कर निर्धारक व संकलक विभाग | रु.३६५/- |
| ३९. | अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परिक्षण विभाग | रु.३६५/- |
| ४०. | शे.रियाज शे.मुजीबोद्यीन | संगणक ऑपरेटर | संगणक विभाग | रु.३६५/- |
| ४१. | जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | कार्य.अभियंता (अ व ड) कार्या. | रु.३६५/- |
| ४२. | पद्माकर जाधव | डार्करूम सहा. | आरोग्य विभाग | रु.३६५/- |
| ४३. | अनिल जी.मगरे | अग्निशामक | अग्निशमन विभाग | रु.३६५/- |
| ४४. | आरेफ खान मसुद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| ४५. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| ४६. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| ४७. | शे.फईम शे.बशीरोद्यीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| ४८. | मिलिंद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| ४९. | शेख रऊफ शे.माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **५०.** | महंमद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५१.** | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५२.** | जगदीश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५३.** | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५४.** | रमेश सिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५५.** | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५६.** | शेख निजाम शेख दगडू | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५७.** | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५८.** | गुलाम रसुल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **५९.** | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **६०.** | अरूण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **६१.** | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **६२.** | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.३६५/- |
| **६३.** | शेख जावेद शे.अमजद | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-१ विभाग | रु.३६५/- |
| **६४.** | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-१ विभाग | रु.३६५/- |
| **६५.** | मो.रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | रु.३६५/- |
| **६६.** | विजय उजीवाल | सर्प पकडणार | प्राणी संग्रहालय विभाग | रु.३६५/- |
| **६७.** | रमेश शिंदे | प्लँट ऑपरेटर | पाणी पुरवठा-१ विभाग | रु.३६५/- |

तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार उक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.१५/११/२०११ पासून पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-२ व वर्ग-३ संवर्गातील प्रस्तावात नमुद विविध संवर्गातील विविध विभागात कार्यरत असलेले व प्रस्तावात नमूद ठरावीक व दैनिक वेतनावर असलेले अनुक्रमांक १ ते ६७ अधिकारी/कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.१५/११/२०११ पासून पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं.५७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२१० दिनांक १८/०१/२०११ झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील वर्ग-४ कर्मचा-यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/८८३/२०११ दिनांक २६/०६/२०११ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ३१/१०/२०११ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापना वरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे. तसेच जा.क्र/मनपा/आस्था-१/२०११/१६५३ दि.१५/११/२०११ अन्वये दै.वेतनावर कार्यरत कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगानुसार निश्चित

केलेल्या दै.वेतनाच्या दरानुसार वर्ग-४ संवर्गातील कर्मचा-यांना रु. २१८/- ऐवजी रु. २९५/- सुधारीत दै. वेतनास मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | दै.वे.सेविका | प्रकल्प विभाग | रु. २९५/ |
| २ | दिपक शेषराव दाभाडे | दै.वे.सेवक | मा.उपआयुक्त (म) दालन | रु. २९५/ |
| ३ | रविंद्र प्रभाकर देवकर | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ४ | स.शहाबुद्दीन स.जकरूद्दीन | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ५ | रमेश सखाराम जाधव | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ६ | सुनिल धर्माजी भुंजगे | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ७ | रविंद्र विठ्ठल कांबळे | दै.वे.सेवक | रमानगर वाचनालय | रु. २९५/ |
| ८ | नारायण शिवनाजी सपाटे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ९ | रमेश दत्तु देवडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १० | विनोद पांडूरंग तुपे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ११ | सुधाकर आसाराम त्रिंभुवन | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १२ | गोविंद  कृष्णराव साळवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १३ | संजय विठठल इंगळे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १४ | समिंदर रमेश | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५ | प्रल्हाद गुंजाळे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १६ | कडूबा औताडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १७ | मिलिंद दत्तोपंत आम्ले | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १८ | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | सतिश सोमाजी गडवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २० | सर्जेराव शिंदे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २१ | सुभाष निलकंठ | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २२ | रामेश्वर फुलारे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २३ | कमलबाई शिवन्ना गुडम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २४ | कमलबाई भिमराव साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २५ | रंजना तुळशीराम मोरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २६ | लताबाई कारभारी | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २७ | शहनाज बेगम रशिद खॉं | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २८ | इंदुबाई पांडूरंग दांडगे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| २९ | इंदुबाई राजुरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३० | मंगलाबाई मिश्राम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३१ | चंद्रकला शंकर आम्ले | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३२ | उषा सुनिल घोगरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३३ | संध्या श्याम साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३४ | सुनिता किसन साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३५ | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३६ | जकीया बेगम अ.हमीद | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३७ | यशोधरा नामदेव वसाटे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ३८ | विद्या मनोहर शेळवणे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३९ | शारदाबाई सदाशिव जगधने | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४० | छायाबाई अशोक म्हस्के | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४१ | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४२ | राजेश प्रभाकर पवार | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४३ | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४४ | रावसाहेब जाधव | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४५ | कुदन काशिनाथ गणोरे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४६ | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४७ | रविंद्र खापे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४८ | संदिप सुभाष घाग | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ४९ | प्रल्हाद विठ्ठल करडे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ५० | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ५१ | शे.करीम शे.हुसेन | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ५२ | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ५३ | अय्युब खॉं सांडू खॉं | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ५४ | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रु. २९५/ |
| ५५ | अण्णासाहेब दाणे | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रु. २९५/ |
| ५६ | कैलास श्रीपत बनकर | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रु. २९५/ |
| ५७ | असलम खान मुकीद खान | दै.वे.मजूर | निवडणूक विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८ | इलियास अ.बसरावी | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ५९ | मो.युसुफ़ मो.उस्मान | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ६० | मो.आसेफ़ मो.खालेद | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ६१ | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६२ | गयासोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६३ | विमलबाई भुईगड | सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६४ | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६५ | सौ.जयश्री वसंत | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६६ | विलास दत्तू नाईक | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६७ | सुरेश दामोधर नलावडे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६८ | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६९ | श्रीमती.पार्वता दाडेकर | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७० | भरत पचलोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७१ | सुभाष दत्तात्रय सुरासे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७२ | मुंढे भानुदास नरसू | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७३ | कमल कचरु मोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४ | भोसले पंढरीनाथ | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७५ | नारायण शेषराव जंगले | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७६ | वाचा सुंदर संतोष | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७७ | निकम शांताराम नारायण | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७८ | तनवीर खान नियाजी | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७९ | शेख हबीब लाल | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८० | मनिषा किसनराव पाटील | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८१ | फ़िरोज खान गणी खान | दै.वे.वॉर्डबाय | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८२ | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | दै.वे.वॉर्डबाय | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८३ | प्रवेश आजी मिसाळ | दै.वे.वॉचमन | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८४ | युवराज लांडगे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८५ | निरु कृष्णा गवळे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८६ | पुष्पलता सावंत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८७ | जाधव सखुबाई शंकर | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८८ | गायकवाड मिना गणपत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८९ | वाघ सखुबाई आसाराम | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९० | काळे मिनाबाई काशिनाथ | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९१ | फुले धुरपताबाई सांडू | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९२ | फ़िरंगी लिला नरसिंग | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९३ | कांबळे शोभा साहेबराव | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९४ | के.डब्ल्यु.पोपलवार | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९५ | विजय गोविंद साबळे | प्रयोग सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९६ | दिलीप श्रीधर ठोंबरे | दै.वे.मजूर | अग्निशमन विभाग | रु. २९५/ |
| ९७ | बाबासाहेब रंजाजी कांबळे | दै.वे.हमाल | वॉर्ड-ब कार्यालय | रु. २९५/ |
| ९८ | राजेश दिपचंद लाहोट | दै.वे.स्वीपर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| ९९ | किशोर विनायक साबळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०० | नदिम अख्तर | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०१ | विष्णू नारायण काळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०२ | मिर्झा अन्वर बेग | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०३ | बाबासाहेब निवृत्ती बनसोडे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०४ | फेरोज अहमद मुस्ताफ अ.खान | दै.वे.वॉचमन | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०५ | गणेश साहेबराव अजगरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०६ | अनिल येडूबा साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०७ | लताबाई अशोक साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०८ | संजय शामराव ठोबरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०९ | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११० | शेख जावेद शे.जाफर | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १११ | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | दै.वे.सेविका | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११२ | राजु रामचंद्र बडे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११३ | द्वारकाबाई नाना अडागळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११४ | चतुराबाई भिमराव हतागळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११५ | चंपाबाई गणपत निर्मळ | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११६ | दौलत किसन सलामबाद | मजूर | वॉर्ड-फ कार्यालय | रु. २९५/ |
| ११७ | रविंद्र शामसुंदर कांबळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| ११८ | संजय रतन खरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| ११९ | किशोर खुशाल रामटेके | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२० | अतुल हरीचंद्र फुलके | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२१ | शोभाबाई दिलीप साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२२ | जाईबाई साहेबराव साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२३ | हौसाबाई रामभाऊ वडमोर | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२४ | मिनाबाई दामोधर सोनवणे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२५ | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२६ | सावित्रीबाई भगवान मगरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२७ | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२८ | विजय लक्ष्मणराव देशपांडे | वॉचमन | भारत माता मंदिर | रु. २९५/ |
| १२९ | सुनिल किसनराव दाभाडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३० | सतिश केशव बनकर | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३१ | राजेंद्र भागाजी नवगिरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३२ | मिलींद धनाजी गायकवाड | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३३ | बालसिंग भोपाल कणसे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३४ | रामदास हरिचंद्र बमणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३५ | किशोर मोतीराम उगळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३६ | राजेश नाथाजी गवळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३७ | रावसाहेब हरीभाऊ मगरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३८ | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३९ | सुरेश नामदेव खरात | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४० | कैलास पांडुरंग वाणी | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४१ | संतोष गोविंद जगे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४२ | वैजिनाथ देवराव साबळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४३ | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४४ | घनशाम पांडुरंग जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४५ | शंकर पांडुरंग भातपुडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४६ | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४७ | छगन तुळजाराम सलापूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४८ | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४९ | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १५० | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५१ | वाजीद खान मन्सूर खान | गणेश कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५२ | इम्रान उल्ल खान फ़ैल उल्ला | कैसर कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५३ | फ़ारुख अली सराब अली | कैसर कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५४ | एहतेशाम अली हाश्मी | लोटा कारंजा | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५५ | मिर्झा रुफ़द बेग | (सेवक) शहा बाजार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५६ | सुरेश धाबर्डे | दै.वे.चौकीदार | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालन) | रु. २९५/ |

करीता उपरोक्त एकुण १५६ दैनिक वेतनावरील कर्मचा-यांना दोन दिवसाची तांत्रिक खंड देऊन दिनांक ०३/११ /२०११ ते ३०/०४/२०१२ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव पुढील मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : मंजुर

श्रीमती प्रिती तोतला : मागील वेळेस सौ.विजया रहाटकर महापौर असतांना व श्री.बंड साहेब आयुक्त होते त्यावेळी कनिष्ठ लिपीक हे पदनाम नसून नोंदणी लिपीकासाठी ठराव झाला होता पुढील सभेत किंवा ठराव पास करतांना नोंदणी लिपीक या नावानेच देण्यात यावे.व त्यांना रू. ३६५/- दैनिक वेतन देण्याची दुरूस्ती करावी.

श्री.संजय केनेकर : पदनाम बदलु नये ते नोंदणी लिपीकच रहावे. वेतनाबाबत दुरूस्ती करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या प्रस्तावात नमुद विविध विभागात कार्यरत असलेले व प्रस्तावात नमूद ठरावीक व दैनिक वेतनावर असलेले अनुक्रमांक १ ते १५६ कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०३/११/२०११ ते दि.३०/०४/२०१२ पर्यंत सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यास तसेच अनु.क्रमांक ५४ ते ५६ , ६५ ते ६७ , ७० ते ७७ आणि ७९,८० यांना रूपये २९५ ऐवजी ३६५/-रू दैनिक वेतन देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

मा.महापौर :वार्ड क्र. ८७ मध्ये संत सृष्टी हा प्रकल्प मंजूर करण्यात येत आहे. त्यासाठी ४ कोटी ची आर्थीक तरतुद करण्यात आली आहे.

श्री.कृष्णा बनकर :दलित वस्तीतील जी कामे आहे त्यासाठी वेगळा निधी आहे निविदा भरलेल्या आहे पैसे देवून दुसरे काम होवू शकते.दलित वस्ती म्हणून आमच्या भागात काम होवू शकते.ठेकेदारास बिल दिले तर लवकर काम करतील.माझ्या वार्डातील काम ठेकेदाराचे बिल दिले नाही म्हणून थांबले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :नुकत्यात पार पडलेल्या डीपीडीसीच्या निवडणुकीमध्ये या सभागृहाचे १० सदस्य निवडून आले त्यांचा सत्कार करण्यात यावा.

मा.महापौर :ठिक आहे सर्व १० सदस्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात येतो.

यावेळी डीपीडीसीच्या निवडणुकीमध्ये निवडुन आलेले १० सदस्यांचा मा.महापौर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (३२)

**दिनांक २०/१२/२०११ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ३२) रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.सदस्य श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम:**

**प्रश्न क्र.९७:**

अ) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा, हिंदुस्थान आवास, नाथव्हॅलीरोड, नाथपुरम या भागामध्ये एकुण किती बांधकामे बांधकाम परवानगी घेऊन होत आहे. त्यांची यादी नांवासह देण्यात यावे.

ब) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा, हिंदुस्थान आवास, नाथव्हॅलीरोड, नाथपुरम या भागामध्ये मागील ०२ वर्षात एकुण किती बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यांत आलेले आहेत त्यांची यादी नावासह उपलब्ध करुन देण्यांत यावे.

क) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा, हिंदुस्थान आवास, नाथव्हॅलीरोड, नाथपुरम या भागामध्ये ज्या गुत्तेदार अथवा बिल्डरर्सला बांधकाम परवानगी देण्यांत आलेली आहेत त्यांना किती मजले बांधण्याची परवानगी दिलेली आहेत त्यांची यादी उपलब्ध करुन देण्यांत यावी.

**प्र.सहाय्यक संचालक नगर रचना.**

**उत्तर**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नक्षत्रवाडी,कांचनवाडी,ईटखेडा,हिंदुस्थान आवास, नाथव्हॅलीरोड, नाथपुरम या भागामध्ये एकुण किती बांधकाम परवानगी घेऊन होत आहे. त्यांची यादी नावासह देण्यात यावे व इतर प्रश्न बाबत माहिती अपेक्षिलेली आहे.

| | कांचनवाडी | | नक्षत्रवाडी | | ईटखेडा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बांधकाम | भोगवटा | बांधकाम | भोगवटा | बांधकाम | भोगवटा |
| सन २०११-१२ (माहे नोव्हेंबर पर्यंत | १७ | -- | ०५ | -- | ११ | ०४ |
| सन २०१०-११ | १९ | -- | १० | ०१ | २३ | ०३ |

उपरोक्त प्रमाणे बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेल्या आहेत.(सोबत परवाना धारकांची यादी देण्यात येत आहे.) कांचनवाडी,नक्षत्रवाडी, व ईटखेडा हे स्वतंत्र खेडी असल्या कारणाने नगर रचना विभागाच्या उपलब्ध अभिलेखानुसार सदरील माहिती देता येऊ शकली नगर रचना विभागामध्ये भागा नुसार अभिलेख जतन केलेला नाही. तसेच इमारतीच्या उंची बाबत इमारती निहाय नोंद ठेवण्यात येत नाही. त्यामुळे तशी माहिती देता येणे शक्य नाही.

**स.सदस्य श्री.बनकर कृष्णा सांडुजी:**

**प्रश्न क्र.९८:**

१) आरसीएच मध्ये श्री.गणेश शिंदे हे शासनाकडून प्रोग्राम मॅनेजर म्हणुन नियुक्त असतांना त्या ठिकाणी डॉ.निता पाडळकर यांची आवश्यकता आहे का? असेल तर का? डॉ.निता पाडळकर आरसीएचमध्ये किती वर्षापासून कार्यरत आहे?

२) आरसीएच मध्ये किती सिंपुटर खरेदी करण्यांत आले? त्याचा किती नागरीकांना फायदा झाला? खरेदी करण्यांत आलेल्या सिंपुरची किमंत किती? कूणाच्या मंजूरीने खरेदी करण्यांत आली. निविदेतंर्गत खरेदी करण्यांत आलेले आहे का? किती निविदा आल्या? निविदा मागविण्यांत आल्या नसल्यास, का मागविण्यात आल्या नाही?

३) डॉ.निता पाडळकर यांनी मेडीकल ऑफिसर म्हणुन कोणकोणत्या ठिकाणी त्यांची सेवा झाली त्याचा कालावधी देण्यांत यावा व त्यांना चार चाकी स्वत:साठी वाहन वापरता येते की येत असल्यास कोणकोणत्या नीयमात व गाडीचा खर्च किती वार्षीक

४) डॉ.निता पाडळकर या गायनॉलॉजीस्ट असतांना त्यांची सेवा आरसीएचमध्ये का उपलब्ध करुन देण्यांत आली? मनपाच्या दवाखान्यात येणाऱ्या महिला रुग्णांची संख्या जास्त असतांनाही डॉ. निता पाडळकर या गायनॉलॉजीस्ट असून सुध्दा त्यांचेकडे आरोग्य केंद्राचा पदभार का देण्यांत आला नाही?

५) आरसीएच प्रकल्पासाठी सन २००५ पासून आजपर्यंत शासनाकडून किती निधी प्राप्त झाला? व तो निधी कोणत्या कारणासाठी खर्च करण्यात आला? काही निधी परत गेला आहे का? निधी परत गेला असल्यास का परत गेला? ज्या कामासाठी खर्च करण्यांत आला त्याची माहिती? सदरील खर्च हा निविदा काढून खर्ची झालेला आहे का?

**उत्तर :-**

अप्राप्त.

**स.सदस्य श्री.अशोक किसनराव बेहडे:**

**प्रश्न क्र.९९:**

१. सहकार एजन्सी ने दिनांक १ जूलै ते ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश फी ची किती एकूण कोणत्या स्वरुपात महानगरपालिकेला जमा केली.

२. गारखेडा परिसरातील तापडीया यांचे आरक्षन जे उठवले आहे ते अशासकीय होते की शासकीय मंजूरीने उठवले.

३. तापडीया यांनी नाला वळतीकेला गारखेडा परिसरातील तसे नाला वळती करता यतो का?

४. जालना रोड आकाशवानी समोरील रेमंड कापड शोरुम चे जे काही पी.आर.कार्ड मध्ये नोंद आहे ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे का?

५. मागील सर्व साधारण सभेत मा.महापौरांनी बी.ओ.टी. च्या कामा बाबत १) सीध्दार्थ उद्यान २) रेल्वे स्टेशन येथील दिलेल्या आदेशाचे काय झाले व दोन्ही प्रकल्प प्रशासनाने ताब्यात घेतले काय?

**आस्थापना अधिकारी-१**
**तथा, रहदारी फी संकलन प्रमुख.**

**उत्तर :-**

१) मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.मालाड, मुंबई (तात्कालीन रहदारी फी संकलन अभिकर्ता) यांनी रहदारी फी संकलनपोटी दिनांक ०१ जुलै,२०११ ते ३०सप्टेंबर,२०११ या कालावधीसाठी धनादेशाद्वारे रुपये २,३४,८५,०९१/- इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केली आहे.

**बी.ओ.टी. कक्ष प्रमुख :-**

२) बांधा वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.) या शासनाच्या धोरणांस अनुसरुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभागृहाच्या मंजुरी अधिन राहुन शहरातील सिध्दार्थ

उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे आणि न.भु.क्र.१९१४९ रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्यालगत व्यापारी संकुल विकसीत करणेसाठी भाडेपट्ट्यावर देण्यात आलेले आहे.

सदरील प्रकल्पाच्या अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे दालनांत सुनावणी संपन्न झाली. सदर सुनावणीत विषयांकित काम एक वर्षात पुर्ण करणेसाठी संबंधीत विकसक यांना आदेशीत केलेले असुन त्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे. करीता आपणांस माहितीस्तव सविनय सादर.

**सहाय्यक संचालक नगररचना :-**

३) सर्वसाधारण सभा प्रश्न क्रमांक ९९ चे उत्तर खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | सहकार एजन्सीने दि.०१ जुलै ते ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश फी ची किती रक्कम जमा केली. | या विभागाशी संबंधीत नाही. |
| २ | गारखेडा परिसरातील तापडीया यांचे आरक्षण जे उठवले आहे ते अशासकीय होते की शासकीय मंजुरीने उठवले. | औरंगाबाद शहरासाठी मंजुर शासन विकास योजनेमध्ये मौजे गारखेडा येथील न.भु.क्र.१५३०६/१ १५३०७/भाग या मिळकती आरक्षण क्रमांक २२९ " सब डिस्ट्रीक्ट सेंटर" या आरक्षणा अंतर्गत आहे. सदर ठिकाणचे आरक्षण उठविण्यात आलेले नाही. तथापि, समावेश पध्दतीने आरक्षणाचा विकास करणे या पध्दतीचा अवलंब करुन बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ३ | तापडीया यांनी नाला वळती केला गारखेडा परिसरातील तसे नाला वळती करता येतो का? | सेल्फ डेव्हलपमेंट अंतर्गत अस्तित्वात असलेला वाकडा तिकडा वाहणा-या नैसर्गिक नाला प्रवाहास त्याच ठिकाणी मा.प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांनी निर्देशीत केल्यानुसार Realignment करुन नाला ट्रेन करण्याची परवानगी देण्यात आली आहे. |
| ४ | जालना रोड आकाशवाणी समोरील रेमंड कापड शोरुम चे जे काही पी.आर.कार्डामध्ये नोंद आहे ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे का? | सदरील ठिकाणी संबंधीताने अद्यापपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. तथापि, जागेवर वापर सुरु आहे. सदरील वापर बंद करण्यासाठी प्रशासकीय विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. |
| ५ | मागील सर्वसाधारण सभेत मा.महापौरांनी बी.ओ.टी.च्या कामा बाबत दिलेल्या आदेशाचे काय झाले? | या विभागाशी संबंधीत नाही. |

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

---

या वेळी डीपीडीसीच्या निवडणुकीमध्ये निवडुन आलेले १० सदस्यांचा मा.महापौर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.